MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष सव्वीसावे / अंक ५ / मे २०२५

## संपादकीय

### युरोपियन गणित ऑलिम्पियाडमध्ये भारतीय मुलींचे यश

जागतिक स्तरावर विविध विषयांमध्ये ऑलिम्पियाड स्पर्धा आयोजित करण्यात येते. त्यातील गणित ऑलिम्पियाड स्पर्धेत भारत मागील अनेक वर्षांपासून भाग घेत आहे. यासाठी देशांतून चार विद्यार्थी निवडले जातात. त्यासाठी प्रथम प्रादेशिक स्तरावर आणि नंतर राष्ट्रीय स्तरावर लेखी परीक्षा घेतली जाते. ९ वी ते १२ वी या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना या परीक्षेला बसता येते. त्यातून ५० हुशार विद्यार्थी निवडले जातात. या निवडक विद्यार्थ्यांना मुंबईच्या होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रात प्रशिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षण कोचिंग क्लासहून वेगळे असते. या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांमधील समस्या निरसनाची क्षमता विकसित व्हावी यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. प्रशिक्षणास आलेल्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करून ४ जणांची चमू निवडण्यात येते. या चमू बरोबर एक गटप्रमुख आणि एक उपप्रमुख यांचीदेखील निवड केली जाते. ज्या देशात स्पर्धा असेल तिथे सरकारी खर्चाने या सगळ्यांना पाठविण्यात येते. हे कार्य मागील अनेक वर्षे सुरळीतपणे सुरू आहे. प्रत्येक वेळी भारतीय विद्यार्थी अनेक पदके घेऊन परत येतात.

गणिताकडे मुलींचा कल कमी असतो असे निरीक्षण आहे. हे चित्र बदलण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न करण्यात येत आहेत. जेंडर अॅण्ड सायन्स अॅण्ड टेक्नॉलॉजी (Gender and Science and Technology) नावाची एक जागतिक स्तरावर काम करणारी संघटना आहे. ही संघटना मुलींना विज्ञान आणि गणित शिक्षणाकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत असते. याच संदर्भात युरोपियन राष्ट्रांनी पुढाकार घेऊन केवळ मुलींसाठी गणित ऑलीम्पियाड स्पर्धा सुरू केली. स्पर्धेची सुरुवात २०१२ मध्ये झाली आणि पहिली स्पर्धा इंग्लंडच्या केंब्रिज शहरात आयोजित करण्यात आली होती. पहिल्या वर्षी केवळ १९ देशांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. आता ही संख्या ५० च्या पुढे गेली आहे. स्पर्धेचे नाव जरी 'युरोपियन ऑलिम्पियाड' असे असले तरी या स्पर्धेत युरोप खेरीज इतर विभागांतील देश देखील सहभागी होत असतात.

ऑलिम्पियाड स्पर्धेत लेखी परीक्षा घेण्यात येते. या परीक्षेत स्मरणशक्तीची चाचणी केली जात नाही. त्याऐवजी 'समस्या निराकरण क्षमतेचे मूल्यमापन' करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यासाठी सहभागी देशातील गटप्रमुख आणि उपप्रमुख यांना प्रश्न देण्याचे आवाहन केले जाते. या आधीच्या ऑलिम्पियाड स्पर्धेत विचारलेले प्रश्न घ्यायचे नाहीत

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

अशी अट असते. त्यामुळे संपूर्णपणे नवीन प्रश्न निर्माण करण्याचे आव्हान त्यांना स्वीकारावे लागते. वेगवेगळ्या देशांकडून आलेल्या प्रश्नांमधून सहा चांगले प्रश्न निवडले जातात. त्यासाठी एक आंतरराष्ट्रीय समिती स्थापन करतात. हे कार्य गुप्तपणे केले जाते. अशीच गुप्तता उत्तर पत्रिकेच्या मूल्यमापनात देखील सांभाळली जाते.

२०१५ पासून भारत युरोपियन गणित ऑलिम्पियाड स्पर्धेत सहभागी होत आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी होण्याचा भारताला चांगला अनुभव आहे. त्याचा उपयोग करून मुलींना युरोपियन स्पर्धेसाठी तयार करण्यात येते. आपल्या शालेय अभ्यासक्रमात समस्या निरसनाला फारसे महत्त्व दिले जात नाही म्हणून हे कौशल्य मुलींमध्ये विकसित करण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात. या मुलींना दोन दिवसांत एकूण सहा समस्यांचे निवारण करावे लागते. प्रत्येक गणिताला ७ गुण असतात. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थिनीला जास्तीत जास्त ४२ गुण मिळू शकतात. गुणवत्ता यादी तयार झाल्यानंतर त्यातून पहिले एक बारांश विद्यार्थी निवडतात. या सर्वांना 'सुवर्ण पदक' देण्यात येते. उरलेल्या विद्यार्थ्यांमधून जास्त गुण मिळविणारे एक षष्ठांश विद्यार्थी निवडतात. त्यांना 'रजत पदक' देण्यात येते. उरलेल्या मुलींमधून चांगले गुण मिळविणाऱ्या एक चतुर्थांश मुली निवडतात. त्यांना 'ब्राँझ पदक' देण्यात येते. काही मुली वरच्या गटात येत नाहीत. परंतु एखादे उदाहरण सोडविताना त्यांनी विशेष कौशल्य दाखविले असते. अशा मुलींना विशेष पारितोषिक देऊन गौरविण्यात येते. उरलेल्या सर्व सहभागी विद्यार्थिनींना स्पर्धेत उपस्थित असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येते.

२०२५ ची युरोपियन गणित ऑलिम्पियाड स्पर्धा कोसोवो देशातील प्रिश्टिन या शहरात ११ ते १७ एप्रिल या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी भारतातून कु. संजना चॅको, कु. सई पाटील, कु. श्रेया मुंदडा आणि कु. श्रेया गुप्ता रे ह्या चार विद्यार्थिनींची निवड करण्यात आली होती. या चारही मुली त्यांच्या मार्गदर्शकासह कोसोवोला जाऊन या वर्षीच्या युरोपियन गणित ऑलिम्पियाड स्पर्धेत सहभागी झाल्या. त्यातील दोघींना 'रजत' तर दोघींना 'ब्राँझ' पदक देऊन गौरविण्यात आले. त्यांनी आपल्या देशाचे नाव उंचावले म्हणून त्या परत आल्यानंतर मुंबईत आयोजित केलेल्या एका भव्य कार्यक्रमात त्यांचा सत्कार करण्यात आला.

मागील अनेक वर्षांपासून भारत आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाड स्पर्धेत सहभागी होत आहे. त्यात मुलांबरोबर मुली देखील असतात. युरोपियन गणित ऑलिम्पियाड स्पर्धेत केवळ मुलीच सहभागी होत असतात. दोन्ही स्पर्धेत मुलींनी घवघवीत यश मिळविले आहे. 'आम्ही गणितात मागे नाही' हे या मुलींनी परत परत सिद्ध केले आहे. लहान शहरांतील तसेच गावांतील मुलींनी त्यांच्यापासून प्रेरणा घेण्याची गरज आहे. गणित हा केवळ शाळेत शिकायचा विषय नाही, तर जीवनात उपयोगी पडणारा विषय आहे. समस्या निराकरण हे २१ व्या शतकातील महत्त्वाचे कौशल्य आहे. त्याचा विकास या निमित्ताने होतो. म्हणून कनिष्ठ महाविद्यालयात शिकणाऱ्या मुलींनी या संधीचा जास्तीत जास्त उपयोग करावा असे सुचवावेसे वाटते. २०२६ ची स्पर्धा फ्रान्समध्ये, तर २०२७ ची स्पर्धा क्रोयेशियात होणार आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष सव्वीसावे/अंक ५/मे २०२५

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २९ वे/अंक ११ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | रामायणकालीन रामटेक | दिलीप नारायण वंडलकर | २ |
| ३) | सिंधू पाणी वाटप कराराला मूठमातीच द्या..... | भगवान दातार | ८ |
| ४) | बदलती बनगरवाडी! | चंद्रकांत शिंगाडे | १२ |
| ५) | देव चालले | चन्द्रशेखर टिळक | १४ |
| ६) | इंग्रजी मासिकं आणि वर्तमानपत्र वाचताना... | डॉ. आशुतोष जावडेकर | १७ |
| ७) | आर्मेनियन नरसंहार - विस्मृतीत गेलेलं कटू सत्य | शेफाली वैद्य | २० |
| ८) | इंग्रजी कवी जॉन किट्सची कविता | डॉ. आनंद कुलकर्णी | २२ |
| ९) | उंटांची अद्भूत रम्य दुनिया २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष | सौ. अल्पना बापट | २४ |
| १०) | 'A La Carte अलास्का' | डॉ. जयश्री पवार | २८ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३१ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# रामायणकालीन रामटेक

*प्रभू श्रीराम चौदा वर्षांच्या वनवास काळात तब्बल बारा वर्षे चित्रकूटला का थांबले? त्यांचे रामटेकला येण्याचे प्रयोजन नेमके कशासाठी होते? इथे आल्यानंतर त्यांनी काय साध्य करीत रावण व इतर मायावी राक्षसांचा बिमोड घडवून आणला? या व इतर रामायणकालीन घटनांचा वेध प्रयत्न प्रस्तुत लेखात केला आहे. – संपादक*

विंध्य पर्वताच्या पलीकडे नगरापासून दूर असलेल्या अरण्यात ब्रह्म मुहूर्तावर नेहमीच्या सवयीप्रमाणे महर्षी शरभंग सुचिर्भूत होऊन आश्रमाबाहेर येताच त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. काजव्यांच्या झुंडींनी ती भोर रात्र दिव्य प्रकाशाने उजळून निघाली होती. जमीनीवर नारंगी – गुलाबी परागकणांचा थर साचून धरती गुलाबी गालीच्याने झाकोळली गेली होती. गार वारा फुलांच्या मंद सुवासाने भारलेला होता. वर आकाशाकडे लक्ष जाताच सारे ग्रह शुभ चिन्हांनी शोभित झाल्याचे दिसून आले. हे सर्व बघून महर्षी आनंदीत झाले. तत्क्षणी दूरवर दक्षिणेस तपोगिरीतील फक्त हाडांचा ठीग शिल्लक असलेल्या भावंडांची तीव्र आठवण आली. त्यांना सद्गती लाभावी या त्यांच्या प्रार्थनेला अशाप्रकारच्या शुभ चिन्हांद्वारे परमात्म्याने कौल दिल्याचे समजून ते प्रफुल्लित झाले. लागलीच ते तपोगिरीस जाण्यास सिद्ध झाले. पण, त्या आधी त्यांनी शिष्यगणांस तपोगिरीकडे कूच करण्याची सूचना केली.

असाच भास महर्षी अगस्तींही झाला. ते मंद हसले. त्यांना मागचा जन्म आठवला आणि या जन्मात पुढे करायची कामे कशी करायची याचा ठोकताळा ते बांधू लागले. आता ते दक्षिणेकडून बोलावणे येण्याची वाट बघू लागले. या क्षणी ते विंध्य पर्वताच्या द्वारखंड प्रदेशात पोहोचले होते.

त्या आधी...

पौराणिक काळाचा दंडकारण्य प्रदेश म्हणजे आत्ताच्या मध्यप्रदेशातील बिलासपूर, राजिम, कटनी होत. महाराष्ट्रातील नासिक – पंचवटीपर्यंतचा ३०० मैल रुंद व ६०० मैल लांबीचा भूभाग. हा प्रदेश मोठमोठ्या नद्या, नाले व जंगलांनी व्याप्त होता. हे अरण्य साधेसुधे नव्हते. विविध जातींचे भलेमोठे वृक्ष जाडजूड वेलींनी वेढलेले असायचे. घनदाट एवढे की, दिवसा सुद्धा सूर्यप्रकाश जमिनीपर्यंत पोहोचू शकत नव्हता. रानटी श्वापदे आणि विषारी सरीसृपांचा सुकाळ आणि दलदल यामुळे या जंगलातून प्रवास करणे जिकीरीचे होते. अशा त्या प्रदेशावर दंडक नांवाचा राजा राज्य करीत होता. मुनिवर शुक्राचार्य यांची ही तपोभूमी तसेच कर्मभूमी होती. इथेच राहून त्यांनी 'संजीवनी विद्या' सिद्ध केली. राजा प्रजाहितदक्ष आणि कनवाळू असल्याने रयतेचा लाडका होता. इतरांप्रमाणेच मुनिवर शुक्राचार्य हे राजा दंडकाचेही गुरू होते. (शुक्राचार्यांची कर्मभूमी आजही आपल्याला बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवराच्या काठी आढळून येते.) याच अरण्यातील तपोगिरीवर अनेक मुनिवर तेथील गिरीकंदरात, आश्रमात आनंदाने यज्ञ–याग, तप, वेदपुराणांचे श्रवण व पठण आदी पुण्य कार्यात मग्न असत. याला कारण होते तेथील विपुल पाण्याची उपलब्धता. सरोवरे, बारवा, विहिरी बारमाही पाण्याने तुडूंब भरून असायच्या. त्यातच औषधीयुक्त वनस्पती, कंदमुळे, फळे इत्यादींची इथे रेलचेल होती.

सर्वकाही सुरळीत सुरू होतं. पण, एके दिवशी माशी शिंकली. राजा दंडक त्या दिनी मृगयेसाठी अरण्यात

विहार करीत असताना त्याला शिकार गवसली नाही, पण नेमक्या त्याच क्षणी गुरूवरांची कन्या अरजा आश्रमासाठी लागणारे सरपण आणि गोवऱ्या वेचण्यासाठी मैत्रीणींसह त्याच रानात गेली असता दंडकाच्या दृष्टीस पडली. तिच्या मोहक सौंदर्यावर राजा भाळला. त्याची मती गुंग झाली. बऱ्या-वाईटाचा त्यास विसर पडला. क्षणार्धात पाप बुद्धीने विवेकावर मात केली.. . आणि जे व्हायला नव्हते तेच कृत्य त्याच्या हातून घडले.

आश्रमात आल्यावर अरजेने सारा वृत्तांत रडतरडत खालच्या मानेने तातांच्या कानावर घातला. आपल्या कन्येचा तो आर्त स्वर ऐकून मुनिवर संतप्त झाले आणि क्रोधाने धगधगत्या स्वरांत राजा दंडकाला धिक्कारत शाप देत बोलते झाले, 'हे पापी दुराचारी ! राजवैभव उपभोगून तू मातला आहेस. गुरू कन्या आपली कोण? यांचा सारासार विचार करण्याच्या विवेकबुद्धीचा तुला विसर पडला आहे. तुझ्या या घृष्टतेचे फळ तुला मिळणारच' आणि हातात कमंडलूतील पाणी घेत ते शाप देते झाले, 'तुझ्या राज्याची सीमा जिथपर्यंत आहे तिथवर पुढील सात वर्षं पाऊस पडणार नाही. पाणी आणि अन्नावाचून ही भूमी वंचित होईल. प्रजा देशोधडीला लागेल.' मुनिवरांचा शाप सार्थक ठरला. संपूर्ण दंडक राज्य विराण झाले. आपल्या राज्याची अशी दुर्दशा बघून राजा अत्यंत दुःखी झाला. त्याला त्याच्या कुकर्माचा पश्चात्ताप झाला. त्याच विदीर्णावस्थेत तो मुनिवरांपुढे उपस्थित झाला. गयावया करत राज्य परत हरीत करण्याची विनंती करू लागला. मुनिवरांनी विचार केला, 'चूक राजाची. त्याचा ताप प्रजेला का? परंतु दिलेला शाप ते परत घेऊ शकत नव्हते. तेव्हा विचाराअंती ते बोलते झाले, 'राजन ! शापाचा सात वर्षांचा कालावधी आटोपताच हाच शाप आशीर्वादात परिवर्तीत होईल. त्यावेळी प्रभू स्वतः या क्षेत्री येतील. जसजशी त्यांची पाऊले या क्षेत्रावर पडत जातील तसतसे हे क्षेत्र हरभरीत होत जाईल आणि दंडकारण्याला राक्षसी प्रवृत्तीच्या लोकांपासून मुक्ती मिळेल. हे राज्य सुजलाम् - सुफलाम् होईल. मात्र, तू केलेल्या पापातून मुक्ती मिळण्यासाठी तुला तोपर्यंत हरीभजन करीत राहावे लागेल 'मुनिवर शुक्राचार्यांचे हे आशीर्वचन ऐकून राजा दंडकाला हायसे वाटले आणि तो हरीभजनात लीन झाला.

इकडे मुनिवर शरभंगांच्या आज्ञेनुसार त्यांचे शिष्यगण तपोगिरीवर पोहोचू लागलेत; पण इथे त्यांच्यासाठी वेगळेच वाढून ठेवले होते. ते इथून निघून गेल्यावर रिकाम्या झालेल्या जागेवर मधल्या काळात आतापी, वातापी आणि इल्वव या मायावी राक्षसांनी ताबा मिळवला. गोड बोलून ते आपले इप्सित साध्य करायचे. त्यासाठी लहान भाऊ इल्वव यास कापून त्यापासून वरवर दिसणारे सात्विक भोजन तयार करायचे आणि आलेल्या पाहुण्यांना आग्रहाचे निमंत्रण द्यायचे. एकदा का पाहुण्यांचे पोट भरले की दोघेही मोठे बंधू मोठ्याने 'इल्वव इल्वव' असे ओरडायचे. त्यांचा आवाज ऐकून इल्वव भोजन घेतलेल्या पाहुण्यांचे पोट फाडून बाहेर पडायचा! त्यांच्या अशा कृत्यांमुळे अनेक शिष्यांना त्यांचे प्राण नाहक गमवावे लागले.

शरभंग ऋषी मागाहून तपोगिरीवर पोहोचले असता त्यांना सारा वृत्तांत कळला. ते दुःखी झाले. लागलीच त्यांनी ध्यान लावले. तेंव्हा अंतश्चक्षूद्वारे भविष्यात होणाऱ्या घडामोडींचा वेध घेत त्यांनी शिष्यगणांस आश्वस्त करीत प्रबोधन केले, 'फक्त कांही दिवस कंदमुळांवर दिवस काढून जपतप यात वेळ घालवा. त्रिकाल दृष्टीने संपन्न आणि तीन आचमनात ज्यांनी विशाल सागर कोरडा केला, त्या मुनिश्रेष्ठ अगस्ती ऋषींचे लवकरच इथे आगमन होणार असून, त्यांच्याच हस्ते मायावी राक्षसांचा नि:पात होणार आहे. ते फक्त या भागात बोलावणे येण्याची वाट बघत आहेत.' ते पुढे सांगू लागले, 'दंडकारण्यातील पूर्व भागात सध्या कुंडीनपूर

येथे विदर्भ राजा राज्य करीत आहे. त्याची मुलगी लोपामुद्रा ही महर्षीवर अगस्त्य ऋषींची पत्नी आहे. त्यामुळे विदर्भ राजाकडे आपल्यापैकी कांही जनांनी जाऊन त्यांच्या कानावर तपोगिरीवर आलेले संकट कथन करावे आणि त्याचा नि:पात करण्यास फक्त आणि फक्त अगस्ती ऋषीच सक्षम असल्याचे सांगावे व ऋषीश्रेष्ठांना इकडे बोलावून घेण्याची विनंती करावी. प्रजेची अडचण समजून ते जावयीबापूस विदर्भ प्रदेशाकडे येण्यासाठी रीतसर निमंत्रण धाडतील. 'शिष्यगणांना ही सूचना आवडली. लागलीच त्यांचे शिष्टमंडळ राजास भेटून तपोगिरीचा संपूर्ण वृत्तांत कथन करता झाला. परिस्थितीचा अदमास घेऊन प्रजाहितदक्ष विदर्भ राजाने ताबडतोब महर्षी अगस्तींना सपत्नीक विदर्भात तपोगिरीस पोहोचण्याचे निमंत्रण धाडले.

श्वशुर श्री. विदर्भ राजाचे आमंत्रण हाती पडताच महर्षी अगस्ती विदर्भ देशाकडे कूच करते झाले. वाटेत विंध्य पर्वत आडवा आला. विंध्य हा अगस्तींचा शिष्योत्तम. समोर गुरुवर्य दिसताच तो नतमस्तक झाला. त्याच्याकडे दयापूर्ण कटाक्ष टाकत महर्षी बोलले, 'मी दक्षिणेकडे जात आहे. मी परत येईपर्यंत तू असाच राहा.' महर्षींची आज्ञा शिरोधार्य मानून विंध्य तसाच वाकून उभा राहिला. त्यामुळे त्याचे उंचीबाबत हिमालयाशी स्पर्धा करणे थांबले. या स्पर्धेमुळे सूर्याची किरणे पृथ्वीपर्यंत पोहोचू शकत नव्हती. ती आता धरणीमातेस भरपूर प्रमाणात मिळू लागून ती परत हरीतगर्भ होण्यास सज्ज झाली.

वाटेत महर्षी अगस्तींना सुतिक्षण मुनींचा आश्रम लागला. महर्षींशी नजरानजर होताच सुतिक्षण भावविव्हळ झाले. त्यांचा प्रेमभाव बघून महर्षी अगस्ती काही काळ त्यांचा आश्रमात थांबले. सुतिक्षण मुनींची योग्यता आणि व्यवहार बघून अगस्तींनी त्यांना शिष्यत्व बहाल केले. दक्षिणा म्हणून महर्षी उद्गारले, 'थोड्याच दिवसात विष्णूरूप राम, शेषशायीरूप लक्षण आणि लक्ष्मीरूप सितामातेचे या भागातून जाणे होणार आहे. त्यांना ओळखून आश्रमात घेऊन ये आणि सेवा कर.'

'पुढे त्यांचा दूत होऊन त्या सर्वांना तपोगिरीवर घेऊन ये. आता मी तपोगिरीकडे प्रस्थान करीत आहे.' (मुनिवर सुतिक्ष्णांचा आश्रम मध्यप्रदेशातील जिल्हा – बालाघाट, तहसील – वारासिवनी, ग्राम – रामपायली येथे चनाई नदीच्या काठावर स्थित असून महाराष्ट्रातील तुमसर या गावापासून राष्ट्रीय महामार्गावर सुमारे ७० कि. मी. अंतरावर आहे. रामपायलीचे रामायणकालीन नांव 'राम पायरी' असे होते.)



**सुतिक्ष्ण मुनींचा जिल्हा – बालाघाट, तहसील – वारासिवनी, ग्राम – रामपायली येथील आश्रम**

मुनि सुतिक्ष्णावर याप्रमाणे जबाबदारी सोपवून मुनीश्रेष्ठ अगस्ती तपोगिरीकडे मार्गस्थ झाले. त्यांचे स्वागत ऋषी शरभंग आणि त्यांच्या शिष्यांनी उत्साह पूर्वक केले ; मात्र, त्या सर्वांचे पाठीस लागलेले पोट व अस्थिपंजर शरीर मुनिश्रेष्ठांना बरेच कांही सांगून गेले. त्यांचे आग्रहपूर्वक स्वागत स्वीकारत ते आश्रमाकडे जात असताना आतापी, वातापी बंधू नवीन पाहुण्यांना सात्विक भोजन तयार असून ते घेण्याचा आग्रह करू लागले. आढेवेढे न घेता अगस्ती ऋषी भोजन घेण्यास तयार झाले.. उपस्थित इतरांच्या पोटात शूळ उठला.

महर्षींनी भोजनाचा येथेच्छ स्वाद घेतला आणि जेवण आटोपल्यावर ढेकर देत उठू लागले. आतापी, वातापी नेहमीप्रमाणे 'इल्लव इल्लव' 'म्हणत जोरजोराने ओरडू लागले. पण, कसचे काय ? अगस्ती ऋषींच्या ढेकरेचा त्या बंधूंना अर्थ कळलाच नाही. महर्षींनी त्या ढेकरेसोबतच इल्लवला केंव्हाच पचवून टाकले होते. उरलेल्या दोन भावांचा ताबडतोब वध करून तपोगिरीला मायावी राक्षसांपासून मुक्ती मिळवून दिली. अगस्ती ऋषींच्या या कृत्यामुळे उपस्थित जनसमुदाय उत्स्फूर्तपणे जयजयकार करता झाला. अगस्तींनी जयजयकाराचा स्वीकार करत त्यांना भविष्यातील घटनांबाबत थोडक्यात उद्बोधन केले आणि कांही काळ तपोगिरीत थांबण्याचा मनोदय व्यक्त केला.

इकडे महर्षी शुक्राचार्यांचा शापकाळ संपत आला. तो संपताच प्रभू रामचंद्र भ्राता लक्ष्मण आणि सितामातेसह चित्रकुट येथील वास्तव्य संपवून शुभमुहूर्तावर दक्षिणेकडे निघण्यास सिद्ध झाले. ते जसजसे मार्गक्रमण करू लागले तसतसे वाटेतील नद्या – नाल्यांना पान्हा फुटू लागला. वनराजी पाना–फळांनी आणि फुलांनी बहरून आली. पाखरांच्या चिवचिवाटाने धरणी भरून पावली. पशू आनंदाने उड्या मारून आनंद व्यक्त करू लागले. थोडक्यात, प्रभू रामचंद्रांच्या पदरवाने दंडकारण्य प्रफुल्लित झाले. अरण्यातील तपस्वी प्रभूंच्या दर्शनार्थ रांगेत उभे राहून पुष्पवृष्टी करू लागले. हां हां म्हणता, प्रभू राम, सितामाता आणि लक्ष्मणासह रामपायलीच्या वेशीवर पोहोचले. सुतिक्ष्णाने त्यांना बरोबर ओळखून नम्रपणे आश्रमात आणून त्या सर्वांची विधिवत पाद्यपूजा केली. कांही दिवस मनोभावे सेवा केल्यानंतर प्रभूंच्या आज्ञेनुसार त्यांची साथसंगत करत सर्वांना तपोगिरीवर सुखरूप आणले. महर्षी अगस्ती आणि इतरांनी त्या सर्वांचे यथोचित स्वागत केले. मात्र, अलौकिक तेजाने तळपणारे मुखमंडल पण कृश देहयष्टी असणाऱ्या मुनींची अवस्था बघून प्रभू मनातून चरकले. त्यांची प्रश्नार्थक मुद्रा बघून मुनीश्रींनी मागे घडलेल्या घटनांचा वृत्तांत कथन करत मृतात्म्यांना सद्गती मिळवून देण्याची प्रार्थना केली. तेव्हा प्रभूंनी आसमंतात असणाऱ्या सगळ्या अस्थी एकत्र करण्याचे आवाहन उपस्थितांना केले. हे कार्य लगोलग आटोपले. यानंतर प्रभूंनी बाण मारून पाताळातील बाणगंगेस पृथ्वीवर येऊन बाजूच्या कुंडात स्थिरावण्याचे आर्जव केले. ती स्थिर होताच ब्रह्मास्त्र उगारून पृथ्वीवरील सर्व तिर्थांना त्या कुंडात येण्यासाठी आवाहन केले. त्यानुसार सारी तिर्थे कुंडात एकवटली. अशा पवित्र स्थानी प्रभू रामचंद्रांनी विधीवत श्राद्ध आणि पिंडदान करून त्या अभागी जिवांना मोक्ष प्राप्त करून दिला. प्रभूंनी तयार केलेले हे पवित्र कुंड म्हणजे आजचा नयनरम्य 'अंबाळा तलाव.'

श्राद्ध उरकल्यानंतर अशी परिस्थिती परत उद्भवू नये म्हणून प्रभू रामचंद्रांनी एक बाहू उंचावून प्रतिज्ञा (टेक) केली, 'ज्यांच्यामुळे हे अघोरी संकट उद्भवले त्या मायावी राक्षसांचा मी या पृथ्वीवतलावरून समूळ उच्चाटन करून भगवत् – प्रेमी मुनिकुलास अभय प्राप्त करून देईल.' या घटनेनंतर तपोगिरी हे स्थान 'रामटेक' म्हणून ओळखल्या जाऊ लागले.

पुढे एकांतात अगस्ती मुनींनी प्रभू रामांना प्रश्न केला, 'प्रभू, आपण मायावी राक्षसांचा नायनाट करण्याची प्रतिज्ञा तर केली, पण ती पूर्णत्वास कशी न्याल ?' प्रभू यावर छानसे स्मित करत उत्तरले, 'हे त्रिकालज्ञ मुनिश्रेष्ठा! ते कसे होईल याचे, तसेच मी येथे कां आलो? या सर्वांची उत्तरे आपणाजवळ आहेत. तेंव्हा ती आपल्या तोंडून ऐकून घेण्याची माझी इच्छा आहे.' दोघेही तोडीसतोड. मात्र, प्रभूंच्या इच्छेचा मान राखत मुनिश्रेष्ठ बोलले, 'प्रभू मागच्या जन्मात म्हणजे वामन अवतारात राजा बलींच्या तपश्चर्येवर प्रसन्न होऊन आपण त्यांना वर मागण्यास सांगितले. तेव्हा राजा बलींनी आपण सदोदित

जाळायला काहीच नसले की, पेटलेली काडीसुद्धा आपोआप विझते.

त्यांच्या साहचर्यात राहावे या हेतूने त्यांच्या राजमहालात द्वारपाल म्हणून रहावे' अशी विनंती केली. त्यावर आपण उद्गारले, 'राजन, तुझी इच्छा पूर्ण करणे हे आता माझे कर्तव्य असले तरी विधाता म्हणून मला बरीच कामे करावी लागतात. तेव्हा माझ्याजागी माझे छायारूप विष्णू, शिव आणि ब्रह्मा हे चार-चार महिने द्वारपाल म्हणून तुझ्या सेवेत राहतील. तेव्हा यावर विचार कर. 'राजा बलींनी या तोडग्यास सहर्ष सहमती दर्शवली. त्या वेळेपासून चातुर्मासात विष्णू, कार्तिक पौर्णिमेपासून पुढे चार मास शिव तर उर्वरित तापाचे चार महिने ब्रह्मा द्वारपाल म्हणून राजा बलींच्या सेवेत राहू लागले. कार्तिक पौर्णिमेला सेवाक्रमात बदल होत असल्याने विष्णूस बेल आणि शिवास तुळशीपत्र वाहण्याचा प्रघात सुरू झाला. आता ब्रह्मा म्हणजे तप - उपासनेचा द्योतक. हे उग्र कार्य. ते कठोर असतेच. या कठोरतेची खरी परीक्षा उन्हाळ्यात होते. ओठ शुष्क झाले तरी पाण्यावाचून तपश्चर्येत खंड पडता कामा नये. तेंव्हाच ती फलद्रूप होते. ब्रम्हा या तापाचा अधिकारी. म्हणून उन्हाळ्यातील चार महिने त्यांची द्वारपाल म्हणून राजा बलींच्या महाली नेमणूक झाली.

एवढे झाले तरी प्रभू वामनांचे मन साशंक होतेच. 'आता आपण राजाचे चाकर. ते म्हणतील ती कामे करावी लागणार. समजा त्यांनी पुढेमागे आपल्याजवळ असलेली शक्ती मागून घेतली तर? ती कुणाच्या तरी सुरक्षित हाती सोपवून आपण मोकळे व्हावे.: असा विचार येताच त्यांनी अनेक ऋषीमुनींना या बाबत पृच्छा केली असता बहुतांनी माझे नांव सुचवले. त्यानंतर प्रभू वामनांनी त्यांची विष्णूशक्ती मला प्रदान केली.

अगस्ती ऋषी पुढे सांगू लागले, 'प्रभू, आज ती शक्ती 'अगस्ती बाण' म्हणून या जन्मात माझ्याजवळ आहे. इथून आपणास पुढे गोदातीरी पंचवटीस जावयाचे आहे. तिथेच ज्या कार्यासाठी आपण जन्म घेतला आहे त्या कार्याची खऱ्या अर्थाने सुरुवात होणार आहे. अनेक मायावी राक्षसांचा आपण वध करणार आहात. वाटेत आपली मुनिवर शुक्राचार्यांचीही भेट होईल. त्यांचाही तुम्हाला आशीर्वाद लाभेल.' प्रभू ! आपणास हे सर्व विदित असूनही आपण माझ्या मुखातून ते वदवून घेतले, याबाबत मी खरोखरच भाग्यवान आहे. 'एवढे बोलून महर्षी अगस्तींनी त्यांच्याजवळ असलेला विष्णूबाण प्रभू रामांना अर्पण करून वंदन केले.'

यानंतर प्रभू रामचंद्र पंचवटीकडे जाण्यास सिद्ध झाले. अशावेळ महर्षी अगस्तींनी विनंती केली, 'प्रभू, ही भूमी आपल्या वास्तव्याने पूनीत झालेली आहे. ती सदोदित पावन राहावी, अशी येथील बांधवांची इच्छा आहे. ती आपण पूर्ण करावी.' यावर प्रभू बोलले, 'माझे तेज या स्थळी सदैव राहील. इथे पंढरपूरचा नादब्रह्म, पुरीचा अन्नब्रह्म आणि काशीचा मोक्षबह्म एकत्र येऊन  माझ्या तेजोब्रह्मात विलीन होऊन पुढे बद्रीकाश्रमासाठी प्रयाण करतील. या तेजोबह्माचे दर्शन पुण्यवान लोकांना होईल.' यानंतर प्रभूंच्या उपस्थितीत मुनीश्रेष्ठ अगस्तींनी पेटवलेली धुनी आजतागायत सुरू असून त्यातून निघणारे तेज आजही शक्ती प्रदान करीत असल्याचा भास अनेक भाविकांना होत असतो.



**रामटेक, गडमंदिर परिसरातील अगस्ती ऋषींचा आश्रम**

पुढे रावणवध होऊन प्रभू राम ससैन्य अयोध्येस पोहोचून राज्यकारभार बघू लागले. तेवढ्यात एक विचित्र घटना घडली. एका नागरिकाचा तरुण मुलगा मरण

पावला. बापाआधी मुलाने इहलोक सोडून जाणे ही त्यावेळची अभूतपूर्व घटना होती. पित्याने मुलाचे कलेवर हाती घेऊन राजदरबारात दाखल होत राजा रामास या घटनेबाबत जाब विचारला. प्रभू रामांची मती गुंग झाली. ते भावनाविवश झाले. मात्र, लगेच स्थिरावत राजमहर्षी वशिष्ठांना याबाबत पृच्छा केली. तेंव्हा  घटकाभर ध्यान लावल्यानंतर वरिष्ठांनी सांगितले, 'प्रभू , दंडकारण्यातील तपोगिरीवर शंबूक नांवाचा तपस्वी स्वतःला उलटा टांगून घेत धूम्रपान करीत आपल्या नावाचा सतत जप करीत आहे. ही घोर तपश्चर्या आपल्या हातून त्याचा उद्धार व्हावा या मुमूक्षेणे करीत आहे.'




घटनेचा मूळ हेतू कळल्यावर प्रभू राम वायूवेगे हनुमंताच्या खांद्यावर बसून तपोगिरीला लगोलग पोहचले. इथे आल्यानंतर फक्त हाताने बाण फेकून प्रभूंनी शंबूकाची तपश्चर्या भंग केली आणि त्याच्यासमोर प्रगट होत बोलले, 'शंबूका! तुझे तप नियमाविरुद्ध असल्याने पृथ्वीवरील घटनाक्रम विरुद्ध दिशेने वाटचाल करू लागला आहे. याचे प्रायश्चित्त म्हणून तुझा अंतच श्रेयस्कर आहे. ते तुझी शेवटची इच्छा सांग. ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करीन.' यावर शंबूक क्षणार्धात उत्तरला, 'प्रभू ! इहलोकातून माझी सुटका आपल्या हस्ते होत आहे, यातच मी भरून पावलो आहे त्यात आपण माझी शेवटची इच्छा विचारता आहात. हे माझे अहोभाग्यच! प्रभू, आपण ज्या राजसी रूपात आलात; त्याच राजसी रूपात आपण सितामातेसह भ्राता लक्ष्मणाच्या संरक्षणात या स्थळी वास्तव्यास असावे. त्यामुळे आपल्या साधारण भक्तांनासुद्धा आपले दर्शन सदोदित होत राहिल. तसेच आपल्या हातून सद्गती मिळाल्यानंतर माझे नांव सर्वमुखी असावे.' प्रभूंनी दिलेल्या वचनानुसार प्रभू बोलले, 'शंबूका! तू मला शिवासारखाच प्रिय राहशील व धूम्रपान करीत तू तप केल्याने यापुढे लोक तुला 'धूम्रेश्वर' म्हणून ओळखतील.' आजही इतरत्र राम, सिता आणि लक्ष्मणाच्या मूर्ती एकाच मंदिरात आढळतात. पण, रामटेकला प्रभू रामचंद्र आणि सितामाता मागच्या मंदिरात तर भ्राता लक्ष्मणाची मूर्ती समोरच्या मंदिरात संरक्षक स्वरूपात विराजमान आहे. अशाप्रकारे प्रभूंनी आपले वचन पूर्ण केले. असो, कधी रामटेकला येणे झालेच तर गावातील लहान पायऱ्यांनी गडमंदिराकडे जातांना आधी धूमेश्वराचे मंदिर येते. त्या मंदिरास जरूर भेट द्या.

**– दिलीप नारायण वंडलकर**

४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,

नागपूर – ४४००२५

मो.नं.: ९८३४६३६६५५

इ–मेल– wandalkardilipgmail.com

●●●

***दिशा संपर्क दूरध्वनी***

***०२२-२५४२ ६२७०***

जिभेचं वजन खूप कमी असतं; पण तिचा तोल सांभाळणं खूप कमी लोकांना जमतं!!

# सिंधू पाणी वाटप कराराला मूठमातीच द्या.....

*पंडित नेहरुंनी पाकिस्तानविषयीच्या कळवळ्यातून केलेल्या आपल्याच देशाचं नुकसान करणाऱ्या सिंधू पाणी वाटप कराराला दिनांक २३ एप्रिल रोजी पंतप्रधान मोदींनी स्थगिती दिली. या कराराला मूठमाती देण्याच्या दिशेने टाकलेले हे पहिले महत्त्वाचे पाऊल आहे. यावर प्रकाश टाकणारा लेख- संपादक*

'India has purchased a water settlement' असे उद्गार नेहरूंनी ज्या कराराविषयी काढले होते तो होता सध्या चर्चेत असलेला सिंधू पाणी वाटप करार. याच कराराबाबत 'Terrorism and treaty cannot go together' अशी पंतप्रधान मोदींची भूमिका आहे. या दोन्ही नेत्यांच्या वृत्तीतला फरक शोधतांना सापडलेले काही वेगळे संदर्भ देण्याचा हा प्रयत्न.

कोणताही भारतीय माणूस स्नान करतांना सप्तनद्यांचं स्मरण करतो. त्यात सिंधू नदीचा उल्लेख असतो. 'गंगेच यमुने चैवं गोदावरी सरस्वती - नर्मदे सिंधू कावेरी जलेस्मिन संन्निधः कुरू'.. हा श्लोक तर घराघरांत म्हटला जातो. आपल्या राष्ट्रगीतातही 'पंजाब सिंधू गुजराथ मराठा' या ओळीत राज्यांच्या नावांच्या यादीत सिंधू शब्द आहे. आपली संस्कृती ही मुळात सिंधू संस्कृती म्हणून ओळखली जाते. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'आसिंधू सिंधू पर्यन्ता, यस्य भारतभूमिका' (सिंधू नदीपासून सिंधू सागरापर्यंत पसरलेली ही विशाल भारतभूमी) अशीच आपल्या देशाची ओळख करून दिली आहे. इतकी ही सिंधू आपल्या नित्य परिचयाची आहे.

३१८० कि.मी. लांबीची ही सिंधू फाळणीनंतर बहुतांशी पाकिस्तानात गेली असली तरी आजही या नदीचा ९०० कि. मी. चा प्रवाह भारतातून वाहतो हे अनेकांना माहीत नाही. पाकिस्तानच्या मध्यभागातून उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत वाहणारी ही नदी पाकिस्तानची जीवनदायिनी आहे. कराची जवळ ती समुद्राला मिळते. कराची हे पाकिस्तानचं सर्वांत मोठं बंदर आहे.

बारमाही वाहणाऱ्या सिंधू आणि तिच्या उपनद्या हाच त्या सागराचा मुख्य जल स्रोत आहे. त्यामुळे सावरकर त्या समुद्राला नेहमी 'सिंधुसागर' म्हणत असत. पाण्याची नेहमीच वानवा असणाऱ्या अरबस्थानचा त्या समुद्राशी तसा फारसा संबंध नाही. तरीपण ब्रिटिशांनी त्याला 'अरबी समुद्र' नाव दिलं आणि आपण ते वेड्यासारख स्वीकारलं!

स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या काही वर्षांत आपल्या राज्यकर्त्यांची मनोवृत्ती अशी होती की 'सिंधू', ही आपली नदी आहे, आपल्या देशातून वाहणारी नदी आहे याचा विसरच आपल्याला पडायला लागला होता. सिंधू व तिच्या झेलम, चिनाब, रावी, सतलज आणि ब्यास (व्यास?) या नद्यांनी हा सारा भूप्रदेश सुजलाम सुफलाम बनवला होता. या नद्यांमुळे सगळ्या जगाचं धान्याचं कोठार बनण्याची क्षमता या प्रदेशाची आहे.

पाकिस्तानचं अस्तित्वच सिंधू नदीवर अवलंबून आहे. त्यामुळे या पाण्यावर आपलाच हक्क असावा असा पाकिस्तानचा नेहमीच अट्टाहास होता. त्यासाठी हा प्रश्न जागतिक स्तरावर नेण्याची पाकिस्तानची तयारी होती. सुरुवातीला १९४८ मध्ये झालेल्या करारानुसार पाकिस्तानने या पाण्याच्या बदल्यात भारताला काही रक्कम देण्याचे मान्य केले होते. पण पाकिस्तान या प्रश्नावरून नेहमीच कुरापती उकरून काढत असे.

याचवेळी या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी अमेरिकेतील टेनीस व्हॅली अथॉरिटिचे प्रमुख डेव्हिड

लिलिएन्टल हे नेहरूंच्या निमंत्रणावरून भारतात आले होते. त्याने जागतिक बँकेकडे हा प्रश्न न्यावा असं सुचवलं. जागतिक बँकेचे त्यावेळचे अध्यक्ष युजेन आर. ब्लॅक यांनी मध्यस्थीची तयारी दाखवली. जागतिक बँकेच्या प्रतिनिधींनी चर्चा केली. पण पाकिस्तानला फाळणीपूर्व स्थितीत मिळत होतं तेवढं म्हणजे सगळंच पाणी हवं होतं. 'भारताचा या पाण्यावर अधिकारच नाही; अशी पाकिस्तानने भूमिका घेतली व चर्चेतून बाहेर पडण्याचा इशारा दिला. पाकिस्तानने या प्रश्नावरून आंतरराष्ट्रीय न्यायालयात जाण्याचाही इशारा दिला. पण हा द्विपक्षीय प्रश्न आहे अशी भूमिका भारताने घेतली.

दोन्ही देश आपापल्या भूमिकेवर ठाम होते. अडलेली चर्चा १९५४ मध्ये पुन्हा सुरू झाली. ६ वर्षे बोलणी चालली होती.

इथेच 'नेहरू टच' झाला आणि १९ सप्टेंबर १९६० ला पंतप्रधान नेहरू आणि पाकिस्तानचे अध्यक्ष आयुबखान यांच्यात सिंधू पाणीवाटप करार झाला. कराची इथं या दोघांनी करारावर स्वाक्षरी केली.

१९६५ च्या युद्धात पराभूत होऊनही, शास्त्रीजींवर ताश्कंदमध्ये दडपण आणून, हवा तसा करार करून घेणारा हाच तो आयुबखान.

नद्या भारतातून जाणाऱ्या होत्या, भारत सर्वार्थाने वरचढ होता आणि गरज पाकिस्तानला होती. असं असतानाही नेहरू हा करार करण्यासाठी पाकिस्तानात गेले. भारताची पडखाऊ वृत्ती इथेच दिसून आली. नेहरूंच्या पाकिस्तानधार्जिण्या धोरणामुळे पाकिस्तानला हवा तसा करार केला गेला. यातल्या तरतुदी पुरेशा बोलक्या आहेत.

१) पश्चिमेकडच्या म्हणजे सिंधू, झेलम आणि चिनाब या नद्यांचे सर्व पाणी पाकिस्तानला मिळेल.

२) पूर्वेकडच्या रावी, सतलज आणि व्यास या नद्यांचे पाणी भारताला मिळेल.

३) पाकिस्तानला सिंधुच्या खोऱ्यात कालव्यांचे जाळे निर्माण करण्यासाठी भारत ८३ कोटी रुपये (६२ दशलक्ष पौंड) देईल. ही रक्कम दहा वर्षांच्या हप्त्यात दिली जाईल.

४) सिंधू, झेलम व चिनाब या नद्यांवर भारताच्या हद्दीत कोणतेही धरण बांधता येणार नाही, किंवा शेतीसाठी ते पाणी वापरता येणार नाही.

५) भारताला या नद्यांचे फक्त १६ टक्के पाणी मिळेल तर ८४ टक्के पाणी पाकिस्तानात सोडावे लागेल.

६) या नद्यांवर भारताला जलविद्युत प्रकल्प उभारता येतील. म्हणजे पाणी न रोखता वाहते पाणी वापरण्याचा अधिकार. (ROR म्हणजे रन ऑफ द रिव्हर )

७) कराराचा आढावा घेण्यासाठी दरवर्षी बैठक होईल.

करारामुळे भारताचा तोटाच झाला.

१) पाकिस्तानातील कालव्यांच्या निर्मितीसाठी भारताने दहा वर्षे इमाने इतबारे ठरलेली रक्कम दिली. १९६५ च्या युद्धाच्यावेळीही तो हप्ता थांबवण्यात आला नव्हता.

२) करारात मान्यता असतानाही पाकिस्तानने झेलम आणि चिनाब नद्यांवरच्या भारतीय हद्दीतील जलविद्युत प्रकल्पांना आक्षेप घेतले.

३) या आक्षेपांमुळे भारताने झेलमवरचा प्रकल्प थांबवला. भारताच्या वूलर, सलाल, बागलीहाल आणि किशनगंगा या प्रकल्पांना पाकिस्तानने आक्षेप घेतले व भारताने कराराचे उल्लंघन केले अशी ओरड सुरू केली.

पाकिस्तानला भारताने नको तेवढे झुकते माप दिले. पण पाकिस्तानचा भारत द्वेष कधीच कमी झाला नाही. ज्यांनी आयुष्यभर मुसलमानांची मनं राखली, प्रसंगी हिंदूंवर अन्याय केला त्या महात्मा गांधींच्या अस्थींचं विसर्जन सिंधू नदीत करण्यास याच पाकिस्तानने परवानगी नाकारली होती! गांधीजींची रक्षा जगातील मोठ्या नद्यात विसर्जित करण्याची योजना सरकारले आखली होती. अनेक देशांनी मान्यता दिली. पण पाकिस्तानने मात्र नकार दिला. ही माहिती भारत सरकारला कळवतांना भारताचे त्यावेळचे पाकिस्तानमधील राजदूत श्रीप्रकाश यांना अश्रू अनावर झाले होते. (संदर्भ – गांधी हत्या आणि मी – गोपाळ गोडसे, पान – १०३, १०४)

भाकरा नानगल हे नेहरूंचं स्वप्न होतं. त्यासाठी भारताला जास्त पाणी लागेल म्हणून नेहरूंनी उदार अंतःकरणाने पश्चिमी नद्यांचा जवळजवळ सर्व वाटा पाकिस्तानला दिला.

भारतात सत्तांतर झालं, मोदी पंतप्रधान झाले आणि पाकिस्तानची अरेरावी बंद करण्याचं धोरण आखण्यात आलं. 'Terrorism and treaty cannot go together' असा इशाराच मोदींनी दिला. कारण २००१ मधला संसदेवरचा हल्ला, २००८ चा मुंबईवरील हल्ला, २०१६ चा उरी हल्ला आणि २०१९ चा पुलवामामधील हल्ला हे मुख्य हल्ले आणि अतिरेक्यांच्या पाकपुरस्कृत कारवाया चालूच होत्या. १९६५, १९७१ आणि कारगिल ही तीन युद्धंही या करारानंतरच झाली होती.

अशा कारवाया चालू असतील तर कोणताही आंतरराष्ट्रीय करार रद्द करण्याची तरतूद व्हिएन्ना कराराच्या कलम ६२ अन्वये आहे याची जाणीव मोदींनी करून दिली.

पूरनियंत्रणासाठी भारताने आत्तापर्यंत काहीच केले नव्हते. पण आता भारत अशी उपाययोजना करील असं भारतातर्फे सांगण्यात आले. म्हणजे भारतीय हद्दीत पाणी साठवण प्रकल्प उभारण्यात येतील. अशा प्रकल्पांच्या संख्येवर करारात कोणतीही मर्यादा घालण्यात आलेली नाही हे भारताने स्पष्ट केलं.

वास्तविक २००३ मध्ये जम्मू – काश्मीर विधानसभेने हा करार रद्द करण्याचा ठराव संमत केला होता. २०१६ मध्येही असाच ठराव परत करण्यात आला. पाकिस्तानच्या कारवाया वाढल्या तेव्हा कराराचा फेरविचार करावा लागेल असा इशारा भारताने २०१६ मध्ये उरी इथल्या हल्ल्यानंतर दिला. २०१९ च्या पुलवामा हल्ल्यानंतर नीतिन गडकरींनी अधिक स्पष्ट शब्दांत 'भारतातून वाहणाऱ्या नद्यांचं पाणी भारतातच वळवलं जाईल' असं जाहीरपणे सांगितलं. करारचं दफन करण्याच्या दिशेने टाकलेलं हे पहिलं पाऊल होतं. २०२३ मध्ये भारताने पाकिस्तानला याबाबत अधिकृत नोटीस पाठवली. वर्षभर वाट पाहून आता या नोटीसचं रिमाईंडर पाठवलं आहे.

'ये मोदी है, छेडेगा नही, लेकीन अगर छेडेंगे तो छोडेगा भी नही' हे वाक्य पाकिस्तानला आता उमजायला लागलं असेल!

याची चुणूक १९९७ मध्ये भाजपचं सरकार असतांनाच दिसली होती. त्यावेळी सिंधू दर्शन महोत्सव भारताने सिंधूनदीच्या तीरावर अधिकृतपणे आयोजित केला होता.

'फाळणी विसरली पाहिजे' असं गुलजार यांच्यासारखे कवी म्हणत असले तरी कोट्यवधी हिंदू सिंधुला विसरलेले नाहीत याची ती पहिली झलक होती.

भाजप नेते लालकृष्ण अडवानी आणि खासदार तरुण विजय यांच्या प्रयत्नातून लेहपासून ८ कि.मी. अंतरावरील चोगलमसार इथं पहिल्यांदा हा उत्सव सुरू

झाला. २४ जुलै १९९९ रोजी झालेल्या या समारंभानिमित्त केंद्र सरकराने एक टपाल तिकीटही प्रसिद्ध केलं होतं. त्यावर सिंधू नदीचं वर्णन करणारी एक ऋचा आणि सिंधू संस्कृतीचं प्रतिक असलेल्या वृषभाचं चित्र होतं.

या कार्यक्रमाचं अविश्वसनीय वैशिष्ट्य म्हणजे जम्मू काश्मीरचे नेते डॉ. फारुख अब्दुल्ला तिथं उपस्थित होते. त्यांनी या कार्यक्रमात वंदेमातरम् गायलं! एवढंच नव्हे तर ते म्हणाले होते की, 'अडवानीजी हमे कराचीमे पहुँचाकर इसी सिंधू नदीके किनारे वंदेमातरम् गानेका सुवर्ण अवसर जल्दीही प्राप्त करायेंगे. वह दिन अब दूर नही।' ( संदर्भ – जम्मू – कश्मीर – लद्दाख – जैसा मैने देखा, लेखक – श्रीकांत जोशी, पान – २ )

७ जून २००७ ला त्यावेळचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनीच 'शेय' इथं या उत्सवाचं उद्‌घाटन केलं. तुमच्या राष्ट्रगीतातली सिंधू भारतात कुठे आहे? असं अनेकजण विचारतात. त्यांना माहीत नाही की, हजारो वर्षांपासून ही पवित्र सिंधू आमच्या लडाखमधून वाहात आहे असं वाजपेयी तेव्हा म्हणाले होते. ऋग्वेदातील एक ऋचाही त्यांनी उद्धृत केली होती.

ऋग्वेदात सिंधुच्या उपनद्यांची नावं पुढीलप्रमाणे आहेत. झेलम – वितस्ता, चिनाब – असिकिनी, रावी – ईरावती, बियास – विपास, सतलज – सुतुद्री. या नद्यांमुळेच पंजाबला 'पंच आब' असं नाव होतं. त्याचंच पुढे पंजाब झालं. यावेळी उपस्थित असलेल्या नरेंद्र मोदींनी पंतप्रधान झाल्यावर ३ जुलै २०२० रोजी अचानक लडाखला भेट दिली आणि सिंधुच्या तीरावर जाऊन जलपूजाही केली. मनात जे आहे ते मोदी प्रत्यक्षात केव्हा ना केव्हा करतातच असं अनेकदा दिसून आलंय. पाकिस्तानला धडकी भरलीय ती यामुळेच.

संदर्भ मिळवताना सिंधू नदीचं एक सुंदर स्तोत्र सापडलं. ते कुणी रचलं आहे आहे त्याचा उल्लेख सापडला नाही. पण संग्राह्य वाटल्याने इथं आवर्जून देत आहे.

**सिंधू स्तोत्र –**

भारतस्थे दयाशीले हिमालय महीध्रजे।
वेदवर्णितदिव्याङ्गे सिन्धो मां पाहि पावने।
नमो दुःखार्तिहारिण्यै स्नातपापविनाशिनि।
वन्द्यपादे नदीश्रेष्ठे सिन्धो मां पाहि पावने।
पुण्यवर्धिनि देवेशि स्वर्गसौख्यफलप्रदे।
रत्नगर्भे सदा देवि सिन्धो मां पाहि पावने।
कलौ मलौघसंहारे पञ्चपातकनाशिनि।
मुनिस्नाते महेशानि सिन्धो मां पाहि पावने।
अहो तव जलं दिव्यममृतेन समं शुभे।
तस्मिन् स्नातान् सुरैस्तुल्यान् पाहि सिन्धो जनान् सदा।
सिन्धुनद्याः स्तुतिं चैनां यो नरो विधिवत् पठेत्।
सिन्धुस्नानफलं प्राप्नोत्यायुरारोग्यमेव च।

तर हे सिंधू सरिते, तू प्रत्यक्षात कुठेही असलीस तरी आमच्या मनात मात्र कायमची आहेस...

**– भगवान दातार**
ज्येष्ठ अभ्यासक, पुणे

•••

दिशा
नियमित
वाचा.

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

शांततेच्या काळात जर कमी घाम गाळला; तर युद्धाच्या काळात कमी रक्त सांडावे लागेल!

# बदलती बनगरवाडी!

*चंद्रकांत शिंगाडे यांनी त्यांच्या बनगरवाडी या गावाबद्दल जी माहिती लिहिली आहे ती अंत:स्फूर्तीने. वाचून झाल्यानंतर आपणही आपल्या गावाबद्दल लिहायला पाहिजे असे नक्की वाटेल! - संपादक*

खरंच 'गड्या आपला गाव बरा'. कारण गावातील शुद्ध हवा, मोकळं वातावरण, भोळी-भाबडी माणसं, सणवार, देव-देवता, पिढीजात व्यवसाय, विविध प्रकारचे खेळ, शेतीवाडी, जनावरे, अशा अनेक गोष्टींनी गाव सरस असतं. प्रत्येकालाच आपल्या गावची ओढ असते. गाव म्हटलं की अनेक आठवणी मनात येतात. आपलं बालपण, शिक्षण, गरिबी, संकट, गंमती-जमती, खेळ ह्यांचं स्मरण होतं. मलाही माझ्या आवडत्या गावाविषयीच्या आठवणी आठवतात. माझं गाव हे सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील बनगरवाडी आहे. माझा जन्म हा बनगरवाडीतलाच. शालेय शिक्षणही वाडीतच झाले. माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण घेतल्यानंतर नोकरी निमित्त मी मुंबईला आलो. जवळ-जवळ तीस वर्षे मी शहरात राहतोय. मी अधून मधून जोडून सुट्टी आली की गावाकडे जाऊन येतो. जेव्हा जेव्हा मी जातो तेव्हा तेव्हा ३० वर्षां पूर्वीची बनगरवाडी आणि आताची डीजिटल युगातील बनगरवाडी यात मोठा बदल झालेला दिसून येतो. शेती, रस्ते, वीज आणि पाणी या बाबतीत चांगली सुधारणा झाल्याचे दिसून येते. पूर्वी शेती ही नेहमी तोट्यात असायची. त्या मागचं कारण हे पाण्याची कमतरता होय.

परंतु मागील सात-आठ वर्षांपूर्वी बनगरवाडी गावात अभिनेता श्री अमीर खान साहेबाच्या पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून आणि लोक श्रमातून व लोक-सहभागातून जलसंधारणाची खूप कामं झाली. या संपूर्ण काळात बनगरवाडी गावचे सुपुत्र डॉ. नीतिनजी वाघमोडे (भारतीय महसूल सेवा) यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. अनेकजण गावाला पाणीदार बनविण्यासाठी श्रमदान करण्यासाठी शहरातून बनगरवाडीत दाखल झाले होते. त्यात मी सुद्धा गेलो होतो. सकाळी नऊ वाजता वाडीतील सर्वजण आपापल्या हत्यारासह एकत्र येत आणि तीन ते चार तास श्रमदान करीत असत. त्याचा परिणाम असा झाला की, पावसाचे पाणी पडले की ते वाहून न जाता साठविले गेले. अलीकडच्या काळात तर त्तारळी आणि टेंभू योजनेचे पाणी बनगरवाडी शिवारात पोहचले आहे. त्यामुळे पूर्वी शेती आणि पिण्याचे पाणी यासाठी नेहमी संघर्ष करावा लागायचा तो आता कमी झाला आहे. नेहमीच दुष्काळ संपन्न असणारी बनगरवाडी ही कृषी संपन्न बनगरवाडीत रूपांतरीत झाल्याचे दिसते. प्रमुख ज्वारी व बाजरी अशी मोसमी ही दोनच पिके असायची. परंतु अलीकडच्या काळात विविध पिकांचं उत्पादन घेतलं जात. त्यामध्ये ऊस, मका, कांदा, भुईमूग, तूर, सिमला मिरची, भाज्या, फळे इत्यादी.

ओसाड जमिनीचे रूपांतर बागाईत जमिनीत झाले. हा सर्व बदल हा वाडीत झालेल्या जलसंधारणाच्या कामामुळे झाल्याचे माझे स्पष्ट मत आहे. मात्र पूर्वी माझ्या बालपणी आमच्या वाडीत दारूचे व्यसन असलेले बरेच जण असायचे. आम्ही पाच किलोमीटर अंतरावर वरकुटे-मलवडी गावात शाळेला जात असताना आणि संध्याकाळी शाळेतून घरी येत असताना आमच्या वाडीतील व्यक्ती कोणीतरी दारू पिऊन पडलेली दिसायचीच. या अशा व्यसनामुळे अनेकांचे संसारही

रस्त्याला महापुरुषांचे नाव द्यायला सर्वांमध्ये चढाओढ दिसते,
परंतु महापुरुषांनी दाखवलेल्या रस्त्यावरून कोणालाच चालायचे नसते.

उद्ध्वस्त झाले होते. परंतु आता हे प्रमाण खूपच कमी झाल्याचं दिसून येते. जवळ जवळ व्यसनमुक्तीकडे वाटचाल झाल्याचे पाहून खूपच समाधान वाटते. सद्यस्थितीत हा जो झालेला बद्दल आमच्या गावाच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. आमच्या गावाच्या मधून एक रस्ता जातो. तो म्हसवड ते वरकुटे - मलवडी या मुख्य रस्त्याला लिंबटेक येथून सुरू होतो व तो बनगरवाडीमधून पश्चिमेला तीर्थक्षेत्र भोजलिंग देवस्थान पायथ्यापर्यंत जातो. राजकीय श्रेय वादात अडकलेल्या या रस्त्याला आता दुरुस्तीसाठी मंजुरी मिळाली असून कामाला सुरुवातही झाली आहे. रस्ता जेथे सुरू होतो तेथे वाडीतील दानशूर श्री. तानाजीशेठ बनगर आणि दिलीपशेठ बनगर या दोन बंधूंनी स्व-खर्चाने कमान बांधली आहे. तेथे एक शिल्प बसविण्यात आले आहे. शेजारी एक फलक आहे. त्यावर बनगरवाडीची प्राथमिक माहिती दिलेली आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी लोकांनी छान-छान घरे बांधली आहेत. वाडीच्या मध्यभागी मुख्य रस्त्याला लागून प्रस्थावित राजमाता अहिल्याबाई होळकर यांचा पुतळा बसविण्यात येणार आहे. त्याच मुख्य रस्त्याला लागून नवीनच बनगरवाडी ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी सजा, सातारा जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा, आणि थोड्या अंतरावर आठवी ते दहावी पर्यंतचे हायस्कूल आहे.

बनगरवाडी-महाबळेश्वरवाडी या दोन्ही गावच्या विद्यार्थ्यांच्या सोईसाठी हायस्कूलची सुविधा फार महत्त्वाची झाली आहे. त्यासाठी शिक्षणप्रेमी श्री. प्रकाश वीरकर याचे मोलाचे योगदान असल्याचे दिसून येते. पक्क्या रस्त्यामुळे दळणवळण सुलभ होण्यास मदत होत आहे. बनगरवाडी गावाच्या पश्चिमेला खूप मोठी मोकळी जागा आहे. त्याला 'विठोबाचे बन' असे म्हणतात. वाडीचे कुलदैवत विठोबा मंदिर आणि इतर देवाची मंदिरे त्या बनात आहेत. विठोबाच्या बनात पुष्कळ मोकळी जागा असल्यामुळे त्या ठिकाणी शाही लग्न सोहळे पार पाडले जातात. वाडीच्या मध्यवर्ती विठ्ठल-रुखमाईचे भव्य मंदिर आहे. त्या मंदिरासमोर मारुती मंदिर आहे. अलीकडेच त्या मंदिरात संत बाळू मामाच्या मूर्तीची स्थापना केली आहे. दर अमावस्येला बाळू मामाच्या नावानं अन्नदानाचे नियोजन केले जाते. दरवर्षी श्रावण महिन्यात हरीनाम सप्ताह आयोजित केला जातो. खरोखर ही आध्यात्मिक परंपरा २५ ते ३० वर्षापूर्वी कै. शिवाजी गिरजाप्पा बनगर व कै. जालिंदर यशवंत बनगर यांनी सुरू केली होती. ती तशीच अव्याहतपणे चालू आहे. व्यसनमुक्ती, कृषी, शिक्षण, रस्ते, वीज, पाणी, इत्यादी क्षेत्रांत आशादायक आणि भरीव कार्य बदलत्या बनगरवाडीत दिसून येते. राष्ट्रपिता महात्मा गांधी नेहमी म्हणत की, 'भारताचा आत्मा खेड्यात आहे. खेडी सुधारा म्हणजे भारत आपोआप सुधारेल.' हेच आशादायक चित्र बदलत्या बनगरवाडीत दिसून येते.

**- चंद्रकांत शिंगाडे**
पनवेल

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# देव चालले

*दि. बा. मोकाशी यांची 'देव चालले' ही कांदबरी वाचताना इतर काही लेखकांच्या कलाकृतींची आठवण होणे हे संवेदनशील मनाचे द्योतक ठरते. हा आनंद चंद्रशेखर टिळक देऊन जातात आणि आपण 'देव चालले' ही कादंबरी वाचायला उद्युक्त होतो. - संपादक*

काही काळापूर्वी आपल्या मराठी रंगभूमीवर महेश एलकुंचवार यांच्या 'वाडा चिरेबंदी', 'मग्न तळ्याकाठी' आणि 'युगांत' या तीन नाटकांचे प्रयोग एकाच दिवशी एकापाठोपाठ एक असे होत असत.

त्या मालिकेला नाव देण्यात आले होते 'नाट्य त्रिधारा'. त्यावेळी ही मालिकाही मी पाहिली होती आणि 'वाडा चिरेबंदी' हे नाटकही स्वतंत्रपणे दोन - तीनदा पाहिले होते. त्या प्रत्येकवेळी माझ्या मनात एक विचार नेहमी चमकून जायचा.

आजही ज्या ज्या वेळी महेश एलकुंचवार यांची ही नाटके आठवतात त्या त्या वेळी मला असे वाटत राहते की, ही तिन्ही नाटके, विशेषत: 'वाडा चिरेबंदी' हे नाटक दि. बा. मोकाशी यांच्या 'देव चालले' या पुस्तकावर आधारित आहे.

त्यातही एखाद्या एकांकिकेचे पूर्ण नाटकात रूपांतर करायचे प्रयोग मराठी रंगभूमीवर झाले आहेत हे आठवले की मला महेश एलकुंचवार यांची ही तीन नाटके आणि दि. बा. मोकाशी यांची 'देव चालले' ही कादंबरी यांच्याबाबत असे फार वाटायला लागते की, मोकाशी यांची ही कादंबरी त्यातली एकांकिका किंवा नाट्यछटा असावी.

'देव चालले'. दि. बा. मोकाशी यांची ही कादंबरी.

कादंबरी कसली ?

धड लघु कादंबरीही म्हणता येणार नाही त्याला. कारण जेमतेम ६६ छापील पानांचा ऐवज आहे तो. ती ६६ पानेही आटोपशीर आकारांची.

पण आकारावर मात करत आकाशाला आवाक्यात घेईल असा आशय असणारा दस्तऐवज म्हणजे दि. बा. मोकाशी यांची 'देव चालले' ही कादंबरी. याची पहिली आवृत्ती नेमकी कधी प्रसिद्ध झाली हे मला आठवत नाही. काल हे पुस्तक पुन्हा वाचले तेंव्हाही त्या पुस्तकात पहिल्या आवृत्तीचा उल्लेख नव्हता.

मी ज्या ज्या वेळी हे पुस्तक वाचतो त्या त्या वेळी मला वाटणारी दुसरी गोष्ट म्हणजे, हे पुस्तक आणि आपले मन यात पराकोटीचे साम्य आहे. वैद्यकशास्त्र जसे मानते की, मन हा अवयव दिसत नाही, त्यामुळे त्याचा नेमका आकार किती हे सांगता येत नाही; पण तो असतो.

हे पुस्तक अगदी तसे आहे. आकार लहान - आशय महान - आमरण तहान!

हे आमरण तहान हे केवळ यमक किंवा अनुप्रास साधायचा म्हणून लिहिले नाही. ते आपसूक आले आहे.

तो कदाचित माझ्या वयाचा परिणाम असावा. सध्या माझे वय ६४-६५ वर्षांचे आहे. त्यामुळे असेल कदाचित; पण हे पुस्तक मला वारंवार आठवते. या पुस्तकात एक वाक्य आहे ....

वय वाढतं तस मूल्यांचे महत्त्व वाढत जातं. हे पुस्तक अनेक अर्थानं मूल्यवान आहे.

---

दुसऱ्यांच्या चुका शोधून इतरांना सांगण्यापेक्षा,
आपण कसे चांगले आहोत ते सांगितले तर प्रगती निश्चित आहे.

देव चालले ...... !

आणि मग याच पुस्तकातले अजून काही संदर्भ आठवत राहतात ...

दि. बा. मोकाशी या पुस्तकात एके ठिकाणी लिहितात ....

प्रत्येक वाढत्या वयाला मागील वयातील काही तरी गमावून बसावं लागतं. असं गमावलेलं पुढे रम्य रूप घेऊन रुळून बसतं. यालाच देवत्व किंवा देवपण म्हणतात का? देव चालले .... !

आता दीड - दोन वर्षांपूर्वी मी माझ्या आई - वडिलांच्या घराचे नूतनीकरण करून तिथे पुन्हा राहायला आलो आहे. त्यामुळे असेल कदाचित; पण मला माझ्या लहानपणापासूनच्या जुन्या आठवणी फार येतात. आता सेवानिवृत्त असल्याने आठवणी उगाळत बसायला फार वेळ असतो. त्या प्रत्येकवेळी मला दि. बा. मोकाशी यांच्या 'देव चालले' या पुस्तकाची खुप आठवण येते. कारण या पुस्तकात दि. बा. मोकाशी एके ठिकाणी म्हणतात ...

आमच्या आई-वडिलांनी, त्यांच्या घराने आठवाव्या अशा अनेक आठवणी दिल्या; आम्हीं आमच्या मुलांना काय दिले किंवा देणार ?

संस्कृत साहित्यात आठवणींना, स्मृतींना 'देव' म्हटले आहे.

देव चालले...! याच पुस्तकात एक उल्लेख आहे.

मुलांना चांगल्या आठवणी राहाव्यात असं करणं हेच मुले वाढवण्यातले यश आहे.

दि. बा. मोकाशी माझ्या आईचे तिच्या माहेरहून नातेवाईक होते असे मी ऐकून आहे.

देव चालले. ... !

जसे महेश एलकुंचवार यांचे 'वाडा चिरेबंदी' हे नाटक बघताना या पुस्तकाची मला आठवण येते, तसे प्रा. वसंत कानेटकर यांच्या 'सूर्याची पिल्ले' हे नाटक बघताना - वाचताना मला दि. बा. मोकाशी यांच्या देव चालले या पुस्तकाची नेहमी आठवण येते. माझ्या कॉलेजच्या दिवसात एका राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत मी सूर्याची पिल्ले नाटकात काम केले होते. त्या तालमी करतांना 'देव चालले' या पुस्तकाची पारायणे केली असतील. वडिलांनी कष्ट करून घर चालवत लौकिक कमावला असा उल्लेख दोन्हीकडे आहे की!

त्याहीपेक्षा 'देव चालले' या पुस्तकात एके ठिकाणी उल्लेख येतो ...

प्रत्येक कुटुंबात एक कर्तबगार, एक वेडा, एक व्यसनी आणि एखादा परागंदा असतो.

'सूर्याची पिल्ले' या नाटकातही असा उल्लेख येतोच की !

सध्याच्या सामाजिक - राजकीय वातावरणात तर हे पदोपदी अनुभवास येत असते.

सर्वार्थाने ....

देव चालले ..... !

'देव चालले' ही कादंबरी सध्याच्या काळात दररोज आठवावी, वाचावी असे मला नेहमी वाटते. कारण या पुस्तकात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या तऱ्हेने दि. बा. मोकाशी आपल्याला देव म्हणजे काय हे सांगत राहतात. आणि ते सगळे मुळातच वाचण्याजोगे आहे.

आता हेच बघा ना ....

अनेक स्वभावी देव असणं हे माणसांच्या विविध स्वभावांना धरूनच आहे. त्यामुळे आपापल्या प्रकृतीप्रमाणे

देव निवडून आपणाला मोकळ्या मनाने सर्वसाक्षी परमेश्वरा पर्यंत जाता येते. एकेश्वरी देवाची कल्पना सोपी असली तरी तिथं विविध वृत्तीच्या माणसांना एकाच वृत्तीच्या देवाशी सामावून घ्यावे लागते, त्यामुळे प्रकृती विरुद्ध वृत्ती तयार करावी लागून मानसिक विरोध निर्माण होत असतील.

देव ही खूणेची भाषा आहे. देवाचं अधिष्ठान असलं की घर शोभतं.

देव चालले ..... !

मला हे पुस्तक म्हणजे शरीराच्या दररोजच्या जगण्यातून मनाच्या देवत्वाकडे जाण्याचा प्रवास वाटतो. त्यासाठी पावले मात्र टाकावी लागतात. त्याची आधी सुरुवात आणि मग सवय करून घ्यावी लागते. ती सहजासहजी होत नसते. त्याची स्फूर्ती, त्याची सोबत, त्याची संगत म्हणून...

कशाचा तरी आधार - ताल - लय - स्वर शोधली जाते. ही निव्वळ सोबत असते. महत्त्वाचे असते ते पावले टाकणे; टाळणे नव्हे. त्याला कोणाचीही संगत चालते असे सांगताना हे पुस्तक सांगून जाते...

पावलं कशावरही टाकता येतात. म्हणून तर देव चालतात.

देव चालले... !

हा प्रवास कठीण वाटतो. कारण आपण बदलतो. काळ बदलतो. दृष्टिकोन बदलतो.

या प्रत्येकाला त्याचा, त्याचा पेहराव असतो. त्याचा त्याचा पोषाख असतो आणि पोषाख बदलला की चाल-चलनुक बदलते.

ते असे का होते हे या पुस्तकात दि. बा. मोकाशी फार छान सांगतात ....

पोषाखाला संकेत चिकटलेले असतात.

देव चालले..... !

हे पुस्तक वाचणे म्हणजे आपल्याच मनाचा दिवा आपणच सांभाळण्यासारखे आहे. 'वऱ्हाडी माणसे' नाटकात पुरुषोत्तम दारव्हेकर म्हणतात ना ....

पदरआडचा दिवा म्हणजे दुहेरी कसरत. ... दिवा तर विझला नाही पाहिजे आणि पदर तर पेटला नाही पाहीजे.

हे पुस्तक म्हणजे आपले मन आहे. आणि हे मन या पदराआडच्या दिव्यासारखे आहे.

संतकवी सोहोरोबा म्हणतात ना... अंतरीचा ज्ञानदिवा मालवू नको रे

या पुस्तकाचे तरी दुसरे काय सांगणे आहे !

देव चालले ! ..... .

अगदी खरं सांगू ?

हे पुस्तक मला खुप आवडतं. खूप वेळा वाचूनही दरवेळी नव्याने आवडते. कारण माझ्या जगण्याचे ते माझे माझे निमित्त देते. कालपरत्वे ते निमित्त, ते अधिष्ठान बदलतं. बदलत राहावे लागतं. पण ते लागतं. ही गरज या पुस्तकात अत्यंत समर्पक शब्दात मांडली आहे ...

सर्वांना अधिष्ठान लागते, देव चालले ..... !

**- चन्द्रशेखर टिळक**
सी-४०२, राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ, राजाजी पथ,
डोंबिवली (पूर्व), पिन - ४२१२०१
भ्रमणध्वनी - ९८२०२९२३७६

●●●

विजेते वेगळ्या गोष्टी करत नाही ते प्रत्येक गोष्ट वेगळेपणाने करतात.

# इंग्रजी मासिकं आणि वर्तमानपत्र वाचताना...

*इंग्रजी मासिक आणि वर्तमानपत्र वाचताना आपला शब्दसंग्रह कसा वाढवावा यावर डॉ. आशुतोष जावडेकर यांचा लेख - संपादक*

''विलायती वाचताना'' हे सदर न चुकता वाचणारा एक युवक मला नुकताच माझ्या डोंबिवलीमध्ये झालेल्या कार्यक्रमानंतर भेटला आणि म्हणाला, ''दादा, तू भारी सांगतोस पण आम्ही शेवटी काय इंग्रजी वाचतो? - तर फक्त न्यूजपेपर - आणि तोही फार तर फार दहा मिनिटं!'' मला एकदम जाणवलं की, इंग्रजी वाचण्याचा सर्वोत्तम सराव हा वर्तमानपत्र आणि मासिकांमधून होतो हे मला त्याच्यासारख्या महाराष्ट्रातील अनेक युवकांना सांगायला हवं. वर्तमानपत्रातील भाषा मुळात अस्सल, जिवंत असते. तिला सगळे तात्कालिक सहसा आपल्याला माहीत असलेले संदर्भ असतात. एखादी जुनी कादंबरी वाचताना तो काळ, त्या काळातील माणसे यांची माहिती नसल्याने प्रथम वाचनात अनेकदा गल्लत होत राहते. पण वर्तमानपत्र आजचं असतं, आत्ताचं असतं! आणि कुठल्याही चांगल्या इंग्रजी वर्तमानपत्रातले अनेक शब्द हे मुळात कळत-नकळत वाचकाशी शब्दसंपत्ती पटापट वाढवत असतात. वर्तमानपत्र वाचताना व्याकरण आणि वाक्यरचनेचा सराव नकळत होतोच, पण मुळात अर्थाकडे ठोसपणे नेणारे असे ते लेखन असल्याने वाचक तिथे अधिक रेंगाळतो. आणि मासिके किंवा साप्ताहिके? - ती तर इंग्रजी वाचू बघण्याऱ्या नव्या माणसासाठी धमालच आणतात. त्यात सोबत चित्रे असतात, तक्ते असतात, सजावट असते. त्यामुळे एखाद्या शब्दाचा अर्थ अडला तरी अनेकदा या गोष्टींच्या मदतीने तो अचूक कळतो. वर्तमानपत्रातील भाषा ही तथ्य मांडीत जाते. कधीकधी ती फारच कोरडी होते; पण मासिकांमधले लेख हे अनेकदा चटपटीत आणि त्यामुळे अधिक रोचक असतात. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे एकाच मासिकामध्ये अनेक पद्धतींच्या भाषा शैली वाचकाला भेटतात. मला आठवतंय, Conde Nast Traveller भारतात पहिल्यांदा मिळायला लागलं तेव्हा मी त्यावर झडप घालून तासन्तास वाचत बसलेला असे. मुळात प्रवास माझ्या आवडीचा, त्यात या मासिकांमधले फोटो आणि भन्नाट स्थलदर्शन. किती नकळत मला अनेक शब्द नव्याने तिथे भेटले! Exotic हा शब्द मला इतका तेव्हा आवडलेला की, मी साधंसुधं काही समोर आलं तरी तेव्हा त्याला एक्झॉटिक म्हणत असे!

आता हे वाचनसंस्कार नकळत होतात हे खरं, पण आपण जाणतेपणी काही प्रयोग करून इंग्रजीचा वाचक म्हणून स्वतःला अधिक श्रीमंत करू शकतो. मासिकाच्या बाबत बोलायचं तर रोज न चुकता एक आर्टिकल वाचणे, नव्या शब्दप्रयोगांना अधोरेखित करणे, लेखाचे सार आपल्या शब्दांत लिहिणे आणि वेगवेगळ्या लेखांमधली भाषाशैली कशी वेगळी आहे यावर टिपण लिहिणे आदी अनेक गोष्टी करू शकतो. वर्तमानपत्रांबाबत मी तुम्हाला सरळ हा खालील होमवर्क देणार आहे! -

१. हेडलाईन चॅलेंज : इंग्रजी वर्तमानपत्रातील पहिल्या, मधल्या आणि शेवटच्या पानावरील कुठल्याही एकेक हेडलाईन वाचायच्या - फक्त हेडलाईन - बातमी वाचायची नाही. आणि मग डोळे मिटून अंदाज करायचा की बातमीत काय काय असेल? हा मनातला विचार इंग्रजीत करायचा आणि मग बातमी वाचायची. बघा काय गम्मत येते ती!

संकट टाळणं माणसाच्या हाती नसतं; पण संकटाचा सामना करणं त्याच्या हातात असतं!

२. स्किमिंग आणि स्कॅनिंग : पेपरमधलं एखादं मोठं आर्टिकल घ्यायचं. 'ऑप-एड' सारखा लेख समोर धरायचा, पण संपूर्ण वाचायचा नाही. प्रत्येक परिच्छेदाची पहिली आणि शेवटची ओळ फक्त वाचायची आणि झपझप पुढे जायचं. हे झालं स्किमिंग उर्फ गाळीव वाचन. आणि स्कॅनिंग म्हणजे बारकाईने भिंग धरून केलेलं वाचन. एखाद्या छोट्या बातमीच्या प्रत्येक ओळीचा अभ्यास करायचा. नवे शब्द टिपायचे. वाक्यरचना अभ्यासायची.

३. पुनर्लेखन : कधी कधी इंग्रजी पेपरमधील बातमी खूप अवघड शब्दांची बनलेली असते. ते जाणून घ्यायचे शब्द आणि मग सध्या शब्दात त्या बातमीचं पुनर्लेखन करायचं.

४. मोठ्याने वाचणे : हा फार महत्त्वाचा सराव आहे. इंग्रजी पेपरमधील एखादा लेख, एखादी महत्त्वाची बातमी वृत्तनिवेदक वाचतो तशी मोठ्याने वाचायची. अनेकदा अशा वाचनात नवे शब्द ध्यानात येतात, नव्याने अर्थ कळतात. भाषेचं वाचन हे असंही असतं.

५. बातम्यांची शैली कशी वेगवेगळी आहे ते बघणे – पहिल्या पानावरची बातमी ही सहसा राजकारण किंवा समाजकारण यावर असते. आणि शेवटच्या पानावर अनेकदा स्पोर्ट्‌र्स विभाग असतो. 'Rohit Sharma's explosive century' आणि 'Lok Sabha passes landmark bill' यातला फरक तुम्हालाही कळेल. क्रीडा बातमीत वापरलेले विशेषण हे अधिक जिवंत आहे. राजकीय बातमी ही नेमकी, घट्ट आहे.

या हेडलाईन्सवरून एक गंमत. परदेशात गेलो की मी आधी तिथला पेपर घेतो आणि वाचत बसतो. तिथल्या पहिल्या पानावरच्या हेडलाईन या त्यांच्यालेखी अर्थात महत्त्वाच्या असतात. पण कित्येकदा आपल्याला त्याचे साधे संदर्भही माहीत नसतात. अशा वेळी ग्लोबल नागरिकत्वाच्या सगळ्या मर्यादा समोर येतात. लंडनमध्ये एकदा 'दि गार्डियन' हा पेपर वाचत होतो. मी ऑनलाईन अनेकदा वाचतोच, पण हातात मस्त वाटत होतं वाचायला. त्याचा आकारही वेगळा आहे आपल्या पेपर्सपेक्षा. त्यातल्या हेडलाईनमुळे थबकलो – 'Carry on shopping : Super Markets and stores get ready for winter power cuts.' नोव्हेंबर महिना होता. लंडनचा गार वारा मला तेव्हाही सोसत नव्हता. थंडी तर अद्याप यायचीच होती. मग जाणवलं की, ही हेडलाईन भारतात कशी अशक्य आहे. आणि हेही जाणवलं की, कोणे एके काळी जगावर राज्य करणारा साहेब आता मात्र स्वतः पॉवर कटच्या छायेत राहतो!

परदेशी वर्तमानपत्रातील जाहिराती देखील किती बोलतात अनेकदा. 'Adopt King The Lion This Christmas - Just 3 Pound per month' अशी वेगळीच जाहिरात मी त्या वेळी वाचलेली मला आठवते. 'सिंहाची देखभाल करण्यासाठी तुम्ही आर्थिक मदत करा आणि त्याचे परोक्ष पालक बना' अशा आशयाची जाहिरात मला वेगळीच नजर देऊन गेली. सुदैवाने आता बव्हंशी परदेशी पेपर आपल्याला आपल्या फोनवर वाचता येतात. ते काही मोफत नसतात; पण मी सुचवेन की, ट्रायल घेऊन एका तरी परदेशी पेपरची ऑनलाईन प्रतीची वार्षिक वर्गणी भरावी! काही नावे मला सुचत आहेत ती अशी:

१. The Washington Post (अमेरिका) – ट्रम्प आणि झेलेन्स्कीचे वाद इथे वाचावेत! अस्सल राजकीय मालमसाला असलेला पेपर.

२. The Economist (इंग्लंड) – इंग्लंडचा हा पेपर नव्या वाचकांसाठी जरा जड जाईल पण इंग्रजी

आपल्याला उत्तम येते असे मानणाऱ्या मंडळींनी हा पेपर एकदा नीट वाचला की आपल्याला केवढे अद्याप शिकायचे आहे हे नीट कळेल.

३. Al Jazeera English (कतार) – मध्य पूर्वेतील इस्लामी राजकारणाचे वारे अल जझीरामध्ये व्यवस्थित कळतात.

४. The Straits Times (सिंगापूर) – दक्षिण पूर्व आशियाचं हे मुखपत्रच मानायला हवं. फार मस्त असतो हा पेपर.

५. The New York Times (अमेरिका) – झंझावाती आणि अनेकदा वादग्रस्त संपादकीयांसाठी प्रसिद्ध असलेले हे वर्तमानपत्र इंग्रजी भाषेचा सळसळता उत्साह अनेकदा दाखवते.

आणि मासिके तर कित्येक आहेत भारतातल्या भारतात. तुम्हाला कार्स आवडतात, त्याची मासिके आहेत, फॅशन आवडते? – त्याची साप्ताहिके आहेत. प्रवास, अर्थकारण, इतिहास अशा अनेक विषयांना वाहिलेली अनेक इंग्रजी मासिके आहेत. इंग्रजी वर्तमानपत्रेही भारतात अनेक आहेत. प्रत्यक्ष तुमच्या गावात प्रत मिळत नसेल तर या सगळ्यांची ॲप आहेत. कोण म्हणतं, भाषा वाचनाचा सराव फक्त कथा-कादंबरीमुळे होतो! आपल्याला हवे ते वर्तमानपत्र समोर धरायचे, हवे ते मासिक विकत घ्यायचे, मस्त गरम कॉफी समोर धरायची आणि ताज्या इंग्रजीचा तजेलदार गंध हुंगायचा!

**– डॉ. आशुतोष जावडेकर**
ज्येष्ठ भाषा अभ्यासक व दंतशल्यचिकित्सक
पुणे

•••



**सौ. कालिंदी अरुण कोल्हटकर (एम.ए.बी.एड.)**

**अधिष्ठाता :** सौ.आ.के. जोशी इंग्रजी माध्यम शाळा
**सेवा कालावधी :** दि.०२.०७.१९७९ ते ३०.०४.२०२५

विद्या प्रसारक मंडळाच्या सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळेच्या अधिष्ठाता सौ. कालिंदी अरुण कोल्हटकर ह्या माहे जुलै १९७९ मध्ये शाळेमध्ये शिक्षिका म्हणून रूजू झाल्या. आपल्या ४६ वर्षांची यशस्वी सेवा पूर्ण करत सौ. कोल्हटकर ह्या दि.३०.०४.२०२५ रोजी सेवानिवृत्त झाल्या.

तत्पूर्वी विद्या प्रसारक मंडळाच्या दि. २६.०४.२०२५ च्या विश्वस्त व कार्यकारिणी समितीच्या सभेमध्ये उपस्थित असलेले विश्वस्त डॉ. विजय वासुदेव बेडेकर, श्री. शरद विठ्ठल वेंगुर्लेकर, श्री. अुत्तम भास्कर जोशी व डॉ. महेश वासुदेव बेडेकर, तसेच कार्यकारिणी समिती सभासद सौ. अल्पना अशोक बापट, श्री अभय वामन मराठे, श्री जयंत नारायण कयाळ, श्री त्रिविक्रम पांडुरंग बेंद्रे, श्री अनिरुद्ध चिंतामण जोशी, श्री दिलीप गुणाकर जोशी व डॉ. सुधाकर चंद्रय्या आगरकर आणि मंडळाचे प्रबंधक सी. ए. श्री. रवींद्र रघुनाथ रसाळ यांच्या उपस्थितीत सौ. कोल्हटकर यांचा सेवानिवृत्तीपर सत्कार करण्यात आला.

आपली इतरांशी बरोबरी करणे योग्य नाही. कारण प्रत्येकाचा जीवन प्रवास हा वेगळा असतो!!

# आर्मेनियन नरसंहार - विस्मृतीत गेलेलं कटू सत्य

*सध्या भारत आणि तुर्कस्तान यांच्यातील संबंध चर्चेत आहेत. नैसर्गिक आपत्तीमध्ये तुर्कस्तानला मानवतेच्या दृष्टिकोनातूनभारताने तातडीने मदत करून देखील पाकिस्तान सोबत भक्कम उभा राहणारा तुर्कस्थान भारताचा शत्रू असल्यासारखा वाचतो. या परिप्रेक्षात ज्येष्ठ लेखिका शेफाली वैद्य यांचा प्रस्तुत लेख महत्त्वाचा आहे - संपादक.*

मी आर्मेनियन नरसंहाराबद्दल प्रथम ऐकलं, ते शाळा-कॉलेज मधल्या एखाद्या लेक्चर मध्ये किंवा इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातून नव्हे, २००७ साली एका फिल्म फेस्टिवल मध्ये पाहिलेल्या एका इटालियन सिनेमातून. 'द लार्क फार्म'.

एक मन हेलावून टाकणारी, अंतर्बाह्य हलवून टाकणारी कलाकृती-ज्यात एका आर्मेनियन कुटुंबाच्या वाताहातीची कहाणी दाखवलेली होती. तुर्कस्तानच्या अनातोलीया नावाच्या प्रांतात हजारो आर्मेनियन ख्रिस्ती लोकांची वस्ती होती एकेकाळी. पिढ्यांपिढ्यांपासून ते लोक तुर्कस्तान मध्ये राहत होते, तिथली भाषा बोलत होते, तिथल्या लोकांमध्ये मिळून मिसळून राहत होते. समस्या एकच होती, ते धर्माने ख्रिस्ती होते आणि तुर्कस्तानचे ऑटोमन राज्यकर्ते कट्टर, धर्मांध मुसलमान.

'द लार्क फार्म' ह्या चित्रपटातलं एक भयावह दृश्य कायम माझ्या स्मृतीत कोरलं गेलंय. साधारण पहिल्या महायुद्धाच्या आसपासचा काळ. चित्रपटाच्या कहाणीत एका आर्मेनियन लोकांमधल्या सर्व पुरुषांना, अगदी लहान बाळांना देखील अतिशय क्रूरपणे मारून टाकलं जातं आणि सर्व वयाच्या सर्व स्त्रियांना जनावरांच्या कळपासारखा हाकत हाकत सीरियाच्या वाळवंटाकडे चालवलं जातं. ह्या स्त्रियांमध्ये एक गरोदर, दिवस अगदी भरायला आलेली बाई असते. तिच्या डोळ्यांदेखत तिने तिच्या नवऱ्याचा, सासऱ्याचा, दिराचा, पुतण्याचा, मोठ्या मुलाचा अतिशय क्रूर, हालहाल करून झालेला मृत्यू पाहिलेला असतो. ती सारखी प्रार्थना करत असते की, तिला मुलगी व्हावी, मुलगा नको. दुर्दैवाने तिला मुलगाच होतो. तिच्या हातात तिचं नवजात बाळ असतानाच तिच्या बरोबरची दुसरी एक बंदिनी तिला सांगते-तुर्क तुझ्या बाळाचं काय करणार, हे सांगणंही अशक्य आहे. तुर्कांनी आधी इतर बाळांचं काय केलं होतं हे त्या सर्व स्त्रियांनी पाहिलेलं असतं. एखाद्या बाळाचं डोकं भिंतीवर आपटून त्याला मारलेलं असतं, तर कोणाला जिवंत पेटवून दिलेलं असतं. त्या क्षणी ती आई एक हृदयद्रावक निर्णय घेते आणि इतर स्त्रियांच्या मदतीने आपल्या बाळाला कपड्यात गुदमरवून त्याचा जीव घेते, त्या कोवळ्या जीवाने तुर्कांच्या हातून नरकयातना भोगू नयेत म्हणून!



ते दृश्य मला आजही तसंच्या तसं आठवतंय. सिनेमात ते विदारक दृश्य पाहिल्यानंतर मी काही क्षण श्वासही घेऊ शकले नव्हते. आधी मला वाटलं, हे

जर तुम्हाला तुमची श्रीमंती मोजायची असेल तर नोटा मोजू नका; कधी चुकून डोळ्यांत दोन अश्रू आले, तर ते पुसायला किती जण येतात ते मोजा!

नाट्यमय असेल. सिनेमॅटिक अतिशयोक्ती असेल. पण माझ्या स्वभावानुसार घरी गेल्यावर मी आर्मेनियन नरसंहार ह्या विषयाचा अभ्यास केला. शोध घेतला. त्या बद्दल वाचलं आणि खूप रडले.

कारण सत्य सिनेमाच्या कल्पनेहून कैक पटीने भयानक होतं. १९१५ ते १९२३ ह्या आठ वर्षांच्या काळात १५ लाखांहून अधिक आर्मेनियन ख्रिश्चन नागरिकांचे ऑटोमन तुर्कांनी व्यवस्थित आखलेल्या प्लॅननुसार शिरकाण केले होते. आर्मेनियन पुरुषांना एका ओळीत उभं करून गोळ्या घालण्यात आल्या. आर्मेनियन स्त्रियांवर सामूहिक बलात्कार करण्यात आला. लहान मुलांना डोंगरकड्यांवरून फेकण्यात आलं, जिवंत जाळण्यात आलं, गावोगावीच्या चर्चेस जाळण्यात आल्या. लाखो लोकांना अन्न-पाण्याशिवाय सीरियन वाळवंटात हाकत नेऊन उपासमारीने मारण्यात आलं. आर्मेनियन स्त्रियांवर बलात्कार करून त्या ख्रिस्ती होत्या म्हणून त्यांना सीरियन वाळवंटात क्रुसावर टांगण्यात आलं. जवळजवळ दोन लाख आर्मेनियन स्त्रिया आणि मुलांना जबरदस्तीने मुसलमान बनवून त्यांना टर्कीमध्ये मुसलमान घरांमध्ये गुलाम म्हणून ठेवण्यात आलं.



हे युद्धातले मनुष्यवध नव्हते, हा एका संस्कृतीच्या, धर्माच्या मुळावर उठलेला अतिशय क्रूर नरसंहार होता. पण आजही तुर्कस्तान हे सगळं नाकारतो. तिथल्या कायद्यानुसार कुणी 'आर्मेनियन नरसंहार' हा शब्द जरी टर्की मध्ये उच्चारला तरी, तिथल्या कायद्यांतर्गत त्यांना पोलिस उचलून घेऊन जाऊ शकतात, तुरुंगात टाकून त्यांचा अनन्वित छळ करू शकतात.

तरीही, जगात काही देश सत्याशी प्रामाणिक राहिले आहेत.

जगभरातल्या ३४ देशांनी आर्मेनियन नरसंहाराला अधिकृत मान्यता दिली आहे-फ्रान्स, रशिया, कॅनडा, जर्मनी, आणि अलीकडेच अमेरिका. भारताला जर टर्कीला धडा शिकवायचा असेल तर भारताने आर्मेनियन नरसंहाराला अधिकृत मान्यता द्यावी.

अजून एक गोष्ट, जेव्हा तुर्कस्तान मध्ये हे सर्व घडत होतं, लाखो पुरुष मारले जात होते, लाखो आर्मेनियन बायकांवर बलात्कार होत होता, त्यांच्या डोळ्यांदेखत त्यांची बाळं पेटवून दिली जात होती, अगदी बरोबर त्याच कालखंडात, आपले भारतीय अहिंसेचे पुजारी मोहनदास करमचंद गांधी 'तुर्की खलीफत' वाचवण्याचा प्रयत्न खिलाफत चळवळी द्वारे करत होते. खिलाफत चळवळीचा आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा अर्थाअर्थी काहीही संबंध नव्हता, तरीही गांधी आणि मौलाना आझाद त्याच तुर्की ऑटोमन खलिफाला वाचवायचा प्रयत्न करत होते जी या नरसंहारामागची शक्ती होती.

हो तेच तुर्की सरकार, ज्यांनी लाखो लोकांना अन्नपाण्याविना वाळवंटात शेकडो मैल चालायला भाग पाडलं. तेच खलीफा, ज्यांच्या आदेशानुसार आर्मेनियन ख्रिश्चन धर्मगुरूंना सार्वजनिक चौकात जिवंत जाळण्यात आलं.

आजही, ह्या कटू सत्यांकडे आपण डोळेझाक करतो. भारतीय शालेय पाठ्यपुस्तकांमधून खिलाफत

(पृष्ठ क्र. २७ वर)

# इंग्रजी कवी जॉन किट्सची कविता

*प्रख्यात इंग्रजी कवी जॉन किट्स याच्या कवितांवर प्रस्तुत लेखात ज्येष्ठ समीक्षक डॉक्टर आनंद कुलकर्णी यांनी प्रकाश टाकला आहे. - संपादक*

असं वाटलं होतं की, जॉन कीटस नावाचा इंग्लिश कवी आता मला आवडत नाही. कारण त्याची कविता आजच्या काळाला लागू होणारी नाही, ती आउटडेटेड झाली आहे. पण तसं नाही. मन अजूनही त्याचाच कवितेत रेंगाळतय. का व्हावं असं? जीवनाची क्षणभंगुरता आणि मृत्युची अटळता या मानवी अनुभवासोबत निसर्ग आणि त्यात होणारी सौंदर्याची मुक्त उधळण असा आशादायी अनुभव त्याच्या कवितेत नित्य येत राहतो. खरं तर त्याचं आयुष्य दुःखाने काठोकाठ भरलेलं आणि वेदनेन विरून गेलेलं. त्यात त्याला अल्पायुष्य मिळालेलं. वडील, आई, आज्जी, भाऊ असे मृत्यू डोळ्यांसमोर हताशपणे सोसलेले. पैशासाठी दवाखान्यात काम करावं लागलं. स्वतःच्या मनात जखमा भळभळत असताना दुसऱ्याच्या जखमांना मलमपट्टी करावी लागली.

कीटस कवितेचे आर्ट हळूहळू शिकला. इतर तथाकथित विद्वानांसारखी त्याच्याकडे डिग्री नव्हती. Leigh Hunt ते Edmund Spenser Vo William Wordsworth ते William Shakespeare असा प्रभाव स्वीकारत सर्वसाधारणपणे त्याचा कवी म्हणून प्रवास झाला. त्याच्या सुरुवातीच्या कवितांवर खूप बोचरी, झोंबणारी टीका झाली. J. G. Lockhart ने केलेली टीका कदाचित सर्वाधिक जहरी होती. कीटसने डॉक्टरांचा मदतनीस म्हणून औषध विक्री केलेली बरी, कवी होण्याची त्याची क्षमता नाही असं Lockhart ने लिहिलं होतं. त्याचे शब्द: 'It is a better and wiser thing to be a starved apothecary than a starved poet; so back to the shop Mr John, back to "plasters, pills, and ointment boxes," & c.' असे जळजळीत होते. कीटसने त्याची कविता प्रगल्भ झाल्याशिवाय प्रकाशित करू नये असा मोलाचा सल्ला त्याच्या मित्राने म्हणजे पी. बी. शेलीने दिला होता. पण तरीही कीटसने कविता प्रकाशित केल्या. अशा टीकेने कीटस दुखावला गेला होता, पण संपला नव्हता. He was hurt but not crushed.

कीटसच्या सगळ्या odes नी त्याला अव्वल दर्जाचा प्रतिभावंत कवी म्हणून मान्यता मिळवून दिली. त्याची कविता जशी सुंदर आणि प्रत्ययकारी होत गेली तशी त्याची जीवनाची समज प्रगल्भ होत गेली. कीटसच्या बाबतीत कविता आणि जीवनविषयक जाणीव समांतर प्रगल्भ होत राहिले. हतबलता, निराशा, दुःख आणि वेदना यांचा एक सतत आणि संथ प्रवाह त्याच्या कवितेत वाहत राहिला. पण तक्रारीचे सूर, दुःखाचे कढ आणि निराशेची छाया स्वीकार आणि आनंद यात बदलत राहिले. कीटससाठी हे सोपं नव्हतं. कीटससारखं दुःखाला क्वचितच कोणी जवळून पाहिले आणि अनुभवले असेल.

व्यक्तिगत अनुभवांना कवितेत चितारताना त्यांना वैश्विक परिमाण द्यायची किमया कीटसला साधली होती. कवीसाठी व्यक्तिगत असं काही उरत नाही आणि ते व्यक्तिगत गाऱ्हाणं न राहता भिडणारा आशय व्हावं लागतं. कीटसने हे केलं. यासाठी त्याच्या चित्रमय

शब्दशैलीने आणि प्रतिभेने त्याला मदत केली. आपण सगळेच पक्षी बघतो, तारा बघतो, ऋतू अनुभवतो. पण कीटसने यावर Ode to a Nightingale, Bright Star, To Autumn अशा केवळ अप्रतिम आणि कालजयी कविता लिहिल्या. हे म्हणजे त्याच्या प्रतिभेने व्यक्तिगत अनुभूतीला सार्वत्रिक आणि सुंदर रूप दिलेलं होतं. William Hazlitt या विख्यात समीक्षकाने प्रतिभाशक्ती म्हणजे imagination विषयी imagination as an intensification of sensory experience enabling us to transcend self असं व्यक्त केलेलं मत कीटसच्या कवितेला या अर्थाने लागू होतं.

"Where but to think is to be full of sorrow" अस तीव्र उदासीन लिहिणारा कीटस Where are the songs of spring? Ay, Where are they? Think not of them, thou hast thy music too," असं अतिशय दिलासादायक आणि आशादायी लिहिता झाला. हा एकाअर्थी जीवनाच्या आशा-निराशा, जीवन-मृत्यू अशा द्वंद्वाचा केलेला समंजस स्वीकार होता. निसर्ग आणि जीवनचक्र सतत बदलत राहणार. त्यात शोधायचंच असेल तर सौंदर्य आणि आनंद शोधता येईल. बाकी बदलांमुळे येणारं दुःख आपसूक असणारच आहे.

जीवनात फक्त आणि सतत आनंद असं कधीच नसत. मग यावर उपाय काय? आनंद शोधणं. तो कसा शोधता येईल? दृष्टी सुंदर झाली की आपोआप आनंद मिळतो. ती कशी सुंदर करायची? कीटसने ती कवितेतून आणि कवितेमुळे सुंदर केली. आदर्श आणि वास्तव, स्वप्न आणि व्यवहार यात आनंददायी संयोगासाठी त्याला कवितेने मदत केली. त्याला आवडणाऱ्या आणि प्रिय जीवनाचा अनुभव घ्यायला कवितेने मदत केली. कविता त्याच्यासाठी आनंदाचे साधन होती आणि साध्यही होतं. आपण जगतोय ते वेदनादायी असल तरी त्याला समांतर अशी आनंदाची दुनिया कवितेने निर्माण केली आहे याचा कीटसला आनंद आणि अभिमान होता. कवीसाठी जग हळूहळू विस्तृत आणि सुंदर होत जाणं आवश्यक असतं. कीटससाठी हे क्रमशः घडत गेलं.


कीटसला निसर्गात सौंदर्य सापडलं. पक्षाचं गाणं, पानांची सळसळ, मधमाशीचा गुंजारव, फुलांचा ताटवा, उन्हाची चमक अशा कशानेही आणि कशातही त्याला सौंदर्य दिसलं. निसर्गातील सौंदर्याने कीटस मोहरून गेला आणि असा सौंदर्याचा मोहोर त्याच्या कवितेत बहरत राहिला.

जीवनात सुख-दुःख असणारच. कीटसच्या वेळी होतं, आताही आहे. पण त्यातही सौंदर्य शोधून आनंदी राहणं जमायला हवं.

कीटसची कविता यासाठी हवी. आणि यासाठीच ती आजही टवटवीत आणि प्रसन्न आहे.

**- डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे- ४१०५०४

●●●



# उंटांची अद्भूत रम्य दुनिया
# २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष

*प्रस्तुत लेखाच्या शीर्षकावरून 'उंट' या प्रजातीची माहिती वाचण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण नक्कीच झाली असेल! वाचा तर... - संपादक*

**Ethnoveterinary Medicine**

तिचे ( Magnum opus ) मोठे काम, उंटांची संस्कृती व रायकांमधील उंट संवर्धन व पालन पूर्ण झाले होते. तिने निष्कर्ष काढला, रायका हे अनेक गोष्टींत अनुकरणीय होते. पर्यावर्णीय दृष्ट्या, सामाजिक दृष्ट्या व जनावरांच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने. त्यात थोडेफार शेवटचे फेरफार केल्यावर तिचे संशोधन साठ सदस्यांच्या आयोगाकडे त्यांची संमती व टिप्पणी किंवा मताकरिता पाठविण्यासाठी तयार झाले. आता तिला संपूर्ण पशुवैद्यकीय शाखेसाठी तोंडी सादरीकरणासाठी विषय निवडायचा होता. तिला आधीच माहित होते की, तिला Ethnoveterinary Medicine यावर बोलायचे होते.

पारंपरिक पशु औषधे हा पाश्चिमात्य संस्कृती नसलेल्यांचा अभ्यासाचा विषय होता. या विषयांवर विकास मंडळांत बराच औत्सुक्य निर्माण झाले होते. दोन बायकांच्या आंतरविद्याशास्त्रीय संधाच्या प्रयत्नामुळे, एक अमेरिकन मानववंश शास्त्रज्ञ व एका जर्मन पशुवैद्य मॅककॉर्कल, त्यांनी पारंपरिक प्राण्यांच्या उपचार पद्धतींशी संबंधित अनेक संदर्भांची स्रोतांची यादी संकलित करून ही पूर्णपणे नवीन पशुवैद्यकीय शाखा स्थापित केली होती. या सर्व ग्रंथस्रोतानेपुढील अभ्यासांना चालना दिली होती ज्यातून हे सिद्ध झाले की, अनेक संस्कृती - विशेषतः ज्यांच्याकडे प्राणी संगोपन करण्याची दीर्घ परंपरा आहे, जसे की राईका - यांनी त्यांच्या प्राण्यांना प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्यसेवा प्रदान करण्यासाठी त्यांच्या स्वतःच्या स्थानिक प्रणाली आणि संस्था विकसित केल्या आहेत. जिथे विकसनशील देशांच्या दुर्गम भागात, आधुनिक सेवा शिकवल्या जात नव्हत्या, तरीही प्राण्यांच्या आरोग्यसेवेसाठी हाच दृष्टिकोन प्रचलित होता. अशाप्रकारे एथनोव्हेटेरिनरी ज्ञान हे एक महत्त्वाचे स्थानिक संसाधन म्हणून ओळखले गेले होते जे विकास प्रकल्पांमध्ये एकत्रित करणे आवश्यक होते,

दूरवरच्या जागांवर राहून, उंट भटके लोक त्यांच्या पारंपरिक उपचार ज्ञानावर अधिक अवलंबून असण्याची शक्यता होती, तिने संबंधित साहित्य तपासले जे तिच्या म्हणण्याला समर्थन देत होते. सोमाली लोकांना किमान वीस वेगवेगळ्या उंटांच्या आजारांची माहिती होती. तर तुआरेग लोकांना तीसपेक्षा जास्त त्रासांमधले फरक माहित होते. ट्युनिशियन बेदुइन्समध्ये काम करणाऱ्या एका बेल्जियन मानववंशशास्त्रज्ञाने उंटाशी संबंधित १,१०० पेक्षा जास्त संज्ञांची यादी केली होती, त्यापैकी बहुतेक त्याच्या आरोग्याशी आणि रोगाशी संबंधित होती. तिला हे देखील आठवले की सुदानमधील रशैदा पशुपालकांमध्ये, त्यांनी बावीस आजारांची नोंद अतिशय कमी संशोधनाच्या वेळेत केली होती. हळूहळू उदयास येणाऱ्या पारंपरिक संकल्पना किंवा शाखेबद्दल जागरूकता, जी काहीवेळा पाश्चिमात्य पशुवैद्यकीय औषधांविरुद्ध स्वतःला उभे करू शकते, ती अद्याप पारंपरिक पशुवैद्यांच्या जाणीवेत सामील झालेली नव्हती, (झिरपलेली नव्हती) म्हणून तिला वाटले की, तिचे व्याख्यान हे एक योग्य संधी आहे. तिच्या पर्यवेक्षकाला हा पूर्णपणे शहाणपणाचा विचार जाणवत नव्हता. 'ही ज्ञानशाखा पूर्णपणे

पुराणमतवादी आहे. तू सुरक्षिततेसाठी पारंपरिक विषय निवड'. परंतु तिने सुपरवायझरच्या शंका बाजूला सारल्या. तिला रायकांजवळ असलेल्या विशेष पारंपरिक पशुवैद्यकीय ज्ञानाविशयी अनेक उदाहरणे देऊन तिची खात्री पटवली. ब्रिटिश वसाहती पशुवैद्य सुद्धा रायकांच्या ज्ञानाने प्रभावित झाले होते. एका बिटिश उंटाच्या अधिकाऱ्यांनी मान्य केले की रायकांची ट्रायपॅनोसोनियासिस (झोपेचा आजार) युरीनच्या वासावरून ओळखण्याची पद्धत ही ब्लड स्मिअर मायक्रोस्कोपने बघण्याइतकीच खात्रीलायक होती. तिच्या सुपरवायझरने तिला पुढे जायची परवानगी दिली.

ती उत्साहाने परत फिल्ड (जागेवरच) संशोधन सुरू करते. तिने बिकानेरच्या पहिल्या भेटीत अनेक प्रकारची माहिती गोळा केलेली असते. आजारी उंटाविषयी माहिती विचारताच अनेक रायकांनी आजारांची यादी व वनस्पतीय व इतर स्थानिक उपचारांची यादी कळवली. डॉ. देवारामने तिची अनेक पारंपरिक उपचार करणाऱ्यांशी गाठ घालून दिली. त्यापैकी एक डॉ. देवारामचे काका होते. ते तापलेल्या लोखंडाने उपचार करत असत. डॉ. देवारामने अभिमानाने सांगितले की, त्यांना पशुवैद्यकीय डॉक्टरपेक्षा खूप जास्त माहिती होती.

असुजी रायका उंटांवर उपचार करणारा खूप प्रसिद्ध होता. लढाईला लागणारे सर्व उंट साथीच्या रोगाने आजारी पडले तेव्हा आसुजी रायकाने जोधपूरच्या महाराजांना खूप मदत केली होती. असुजीला त्या सर्वांचा रोग बरा करता आला. महाराजानी त्याला मोठे बक्षीस दिले. पहिल्यांदा आजारी उंटांना वेगळे करून उपचार करण्याची पद्धत असुजी रायकांने पहिल्यांदा चालू केली. शेकडो वर्षांनंतर आजही असुजी विषयी या लोकांना अभिनान वाटतो. त्याचा पुतळा उभारण्याचे प्रयत्न आजपर्यंत चालू होते.

तिने व हणमंतने मिळून रायकांसाठी एक प्रश्नपत्रिका तयार केली. त्यांना कुठच्या प्रकारची उपचार पद्धती रायका वापरतात ते आजमावयाचे होते. हणमंतने वीस जणांचा मुलाखत घेतली. त्यापैकी कोणीही जनावरांच्या डॉक्टरचा सल्ला घेत नव्हते. राजस्थानच्या प्रत्येक खेडेगावात पशुवैद्यकीय हॉस्पिटल होते व मोफत उपचार मिळणार होते, पण कोणीही त्याचा फायदा घेत नव्हते. पारंपरिक औषध पद्धतीचा अभ्यास करायचे हे मोठे कारण होते.

उपचार करणाऱ्यांना वेगळ शोधणे कठीण काम होते. प्रत्येक रायकाला कुठल्या ना कुठल्या प्रकारची औषधे माहीत होती. काहीजण काही रोगांच्या औषधे देण्यात पटाईत होते. काहीना मंत्र येत होते. सर्व रायका पुरुष व बायका घरगुती औषधे बनविण्यांत पटाईत होते. ते मेथीदाणे, तिळाचे तेल, लसूण, आले, सोडा, काकवी तर काहीवेळा ते हत्तीचे व गाढवाचे शेणही वापरत. दलीबाई नावाची बाई अतिशय गरीब होती. तिने ज्यांचे पाय निकामी झाले आहेत अशी सोडून दिलेली दोन जनावरे पाळली.

दलीबाईने त्यांची मोडलेली हाडे जुन्या पद्धतीने आधार लावून त्यांना बरे केले. दिवसभर ती जनावरे रानात भटकत असत, रात्री घरी परत येत व दलीबाईच्या मुलांना गरज असलेले दूध देत. दलीबाईप्रमाणे प्रत्येक उंट पालक, उंट जखमी झाला किंवा पाय मोडला तर त्याला वनौषधीचा लेप देत.

काही रायका 'दाम' या उपाय योजनेत प्रवीण होते. daam, म्हणजे तापलेल्या लोखंडाने उपचार करणे. अनेक संस्कृतीमध्ये दामचा वापर करण्यात आला आहे. काही आठवड्यांतच ती अनेक माहितीचे पेपर संकलित करते. अनेक वनस्पतींचा उपयोग 'औषधशास्त्र परिभाषा', कोष मध्येही उल्लेख आहे. (इंडियन मेडिकल मटेरियल)

---

कोणतेही कार्य अडथळ्याशिवाय पार पडत नाही. शेवटपर्यंत जे प्रयत्न करीत राहतात त्यांनाच यश प्राप्त होते!

करंज तेल चोळून रायका मॅनगे आजारावर उपचार करत. पण ते अतिशय उष्ण असल्यामुळे गरोदर उंटांना वापरत नव्हते. त्यामुळे गर्भपात होण्याची शक्यता होती. ईथनोव्हरी उपचार पद्धत ही संमिश्र पद्धत होती. रायकांचा या औषधांवर विश्वास होता व ती कशी वापरायची हे ही त्यांना माहित होते.. तसेच बाजारातलं व्यावसायिक औषधांची माहीती करून घ्यायचीही त्यांची खूप इच्छा होती. पण कधीकधी त्यांना ती जास्त किंमतीला विकली जात किंवा बनावट दिली जात. काहीवेळा ते जास्त डोस, तर काही वेळा कमी डोस देत. पण ट्रायपानोसोमियासिस सारख्या आजारावर पारंपरिक औषधे नव्हती.

तिने तिच्या लेक्चरमध्ये पारंपरिक औषध पद्धतीवर बोलायचे व त्याची तुलना आयुर्वेद, होमिओपॅथी, तिबेटीन औषधपद्धती इत्यादिंशी करायचे ठरविते. ती अनेक रायकांच्या उपचार पद्धतीचे फोटो घेते. त्यात तापलेल्या लोखंडाच्या उपचाराचाही फोटो असतो. तिला वाटते की, पारंपरिक औषध पद्धत प्राध्यापकांमध्ये उत्सुकता निर्माण करेल.

प्रथम ती प्रेक्षकांचे स्वागत करते. नंतर स्लाइड शो दाखवते. तापलेल्या लेखंडाच्या सळईची स्लाइड दाखवल्यावर सभाग्रहांत कुजबूज सुरू होते. टाळ्या वाजत नाहीत. प्रश्नोत्तराच्या वेळेत तिला विचारले जाते की, 'अशा अमानुष किंवा क्रूर उपचाराला तुम्ही कशी सम्मत्ती देता?' ती स्पष्टीकरण देते की, 'असा उपाय शेवटचा उपाय म्हणून वापरला जातो.' पण अतिशय विरोधी असहमतीच्या वातावरणांत ती गडबडते. तिला शेवटचे महत्त्वाचे वाक्य जोरदारपणे सांगायचे असते की, 'म्हणून विकसनशील देशांत, पारंपरिक औषधे हे जनावरांसाठी व ग्रामीण स्वास्थ्यासाठी महत्त्वाचे योगदान आहे. म्हणून त्याचा पशुवैद्यकीय अभ्यासक्रमांत समावेश करण्यात यावा.' पण हे वाक्य ती घाबरत म्हणते. नंतर पशुवैद्यकीय शाखा निकाल देते की, तिचा प्रबंध स्वीकारला जाईल; पण व्याख्यानासाठी तिने सहा महिन्यांत दुसरा विषय निवडावा. तिला याची कल्पना नव्हती की हे सर्व शैक्षणिक क्षेत्रांत प्रवेश करण्यासाठी (दीक्षा समारंभासाठी) आवश्यक होते. तिचे भविष्य खूपच कठीण दिसत होते. पण स्थानिक ज्ञानाविषयी खूप उत्सुकता निर्माण झाली होती. हा तिला खूप मोठा धक्का असतो व तिला माघार घ्यावी लागते. व्याख्यानाचा समावेश ही एक औपचारिकता असते. अशाप्रकारचे उदाहरण (पायंडा) ऐकिवात नसते. हा तिला जर्मनीतील शैक्षणिक कारकिर्दीचा शेवट वाटतो. तिची पर्यवेक्षक तिच्या विरुद्ध जाते. तिने इल्सला तिची संस्थेची मुख्य म्हणून उत्तराधिकारी ठरवलेले असते. पण तिचे अपयश हे त्या पर्यवेक्षकाला लाजिरवाणे ठरते. ती इल्सल तिची कामगिरी कशी अपयशी आहे हे सांगण्यासाठी बोलावून घेते व इल्सला पुन्हा पुन्हा ती कशी शैक्षणिक नाही ते सांगते.

तिला भविष्य उदास वाटते. ती बेरोजगार असते. गॅरी काहीवेळेस जॉर्डनला जातो किंवा लहान शिष्यवृत्ती स्वीकारतो. पशुवैद्य जास्त प्रमाणात उपलब्ध असतात व ती तिचे वैद्यकीय कौशल्य ती विसरली होती. तिचा आत्मविश्वास इतका कमी झाला होता की, ती एकही सुसंगत वाक्य बोलू शकत नव्हती. एक छोटाशी वस्तुस्थिती या सर्वांत होती की, जरी पारंपरिक औषधोपचार ही नेहमीच्या औषधपद्धतीचं समर्थन करणाऱ्यांची आवडती पद्धत नसते तरी 'स्वदेशी ज्ञान' हे प्रचलित वाक्य होते.

वर्षाच्या शेवटी पुण्याला पारंपरिक औषधावर कॉन्फरन्स होते. एक साधे हस्तलिखित उटांच्या आजारांवर पारंपरिक पद्धतीच्या उपचारपद्धतीचे उदाहराणासहित काढायचे ठरवतात. यामुळे तिचा आत्मविश्वास थोडासा दुणावतो. ते उंटांच्या तज्ज्ञांसाठी

कार्यशाळा घ्यायचे ठरवतात. तिचे एक सहाध्यायी बक्रीमुसा सुदानहून, अनेक तज्ज्ञ आफ्रिकेहून व काही भारतीय तज्ज्ञही येतात. पहिल्यांदाच पशुच्या आजारांवर पुस्तक काढतात. त्यांत पारंपरिक ज्ञानालाही महत्त्व दिलेले असते. त्यांनी प्राण्यांच्या आजारांवर असे पहिले पुस्तक तयार केले जे पारंपरिक ज्ञानाला वैज्ञानिक ज्ञानाइतकेच महत्त्व देते.

दोन वर्षांनी परत ती तिचा धडा शिकली आणि एक सादरीकरण तयार केले होते जे कोणत्याही वादग्रस्त गोष्टी, तसेच व्यावहारिक प्रासंगिकतेचे कोणतेही निष्कर्ष टाळते. तिच्या व्याख्यानाचे नाव असते, Indian elephant medicine through ages.

पुन्हा एकदा शिक्षकांना सामोरे जाण्यासाठी तिला दोन वर्षांहून अधिक काळ लागला. ती धडा शिकला होती. तिने एक सादरीकरण तयार केले होते, ज्यांत कोणत्याही वादग्रस्त गोष्टी, तसेच व्यावहारिक प्रासंगिकतेचे कोणतेही निष्कर्ष टाळले होते. त्याचे गूढ शीर्षक ''युगांमधून भारतीय हत्ती औषध'' होते आणि त्यात आयुर्वेदानुसार हत्तींच्या उपचारांचा ऐतिहासिक आढावा देण्यात आला होता. युद्धासाठी त्याचे महत्त्व आणि त्याच्या प्रचंड मूल्यामुळे, हत्ती हा २००० वर्षांपूर्वी भारतीय पशुवैद्यकीय संशोधनाचा विषय बनणारा पहिला प्राणी होता. बहुतेक सादरीकरण प्राचीन काळातील विश्लेषणावर आधारित होते. तिला पदवी मिळाली; पण जर्मनीतील शैक्षणिक कारकिर्दीबद्दलचा तिचा उत्साह नाहीसा झाला होता.

**– सौ. अल्पना बापट**
डॉ. बापट हॉस्पीटल, ठाणे
भ्रमणध्वनी – ९८३३०२९३५६

●●●

(पृष्ठ क्र. २१ वरून – **आर्मेनियन नरसंहार – विस्मृतीत गेलेलं कटू सत्य**)

चळवळीचे आजही आपण गोडवे गातो; पण आर्मेनियन नरसंहाराबद्दल एक शब्दही आपण उच्चारत नाही.

बाकी आर्मेनियन सोडूनच द्या, भारतात इतकी शतके मुसलमानी शासकांनी हिंदूंचा नरसंहार केला, त्याबद्दल तरी आपण कुठे बोलतोय? आपलं सेक्युलरिझम म्हणजे विस्मृती. पण जग आर्मेनियन लोकांना विसरलेलं नाही. दरवर्षी २४ एप्रिलला जगभरातील आर्मेनियन वंशाचे लोक त्यांच्या मृतांचं स्मरण करतात. शोक करण्यासाठी नाही, तर विसाव्या शतकातल्या पहिल्या मोठ्या वांशिक आणि धार्मिक नरसंहाराची स्मृती जिवंत ठेवण्यासाठी. धर्माच्या नावाखाली टर्कीच्या इस्लामी शासकांनी आर्मेनियन लोकांसोबत जे केले ते जगाला कळावे म्हणून.

आणि टर्की? तो देश आज केमाल अतातुर्कच्या प्रगतिवादी विचारांना विसरून परत एकवार इस्लामी कट्टरतेची कास धरतोय. पाकिस्तानला ड्रोन पुरवतोय. दहशतवाद्यांना पाठिंबा देतोय. पण त्याचबरोबर, भारतीय इंस्टाग्राम इन्फ्लुएंसर्सना फुकट टर्कीला यायचे आवताण देतोय.

हो, जा स्वतःचा आत्मा विकून टर्कीला नक्की जा पण तिथल्या सुंदर ठिकाणांवर सेल्फी काढताना हे जरूर लक्षात ठेवा की, ज्या भूमीवर तुम्ही हे करताय, ती भूमी आर्मेनियन रक्ताने ओथंबलेली आहे आणि पहलगाम मध्ये धर्म बघून गोळ्या घातलेल्या त्या २६ निष्पाप हिंदू प्रवाशांच्या रक्तानेसुद्धा!

**– शेफाली वैद्य**
ज्येष्ठ लेखिका
पुणे

●●●

# ‘A La Carte अलास्का’

*डॉ. जयश्री पवार यांनी मे २०२४ मध्ये पृथ्वीवरील नंदनवन ‘अलास्का’ प्रदेशाची सफर केली. ही सहल आयोजित करण्यापासून, ते सहल पूर्ण होईपर्यंत जो आनंद मिळाला, तो सर्वांबरोबर वाटून द्विगुणित करावा म्हणून त्यांचा हा लेखप्रपंच. सात दिवसाच्या या रम्य सफरीचं वर्णन त्यांनी ‘A La Carte अलास्का’ या शीर्षकाअंतर्गत सात लेखांत प्रस्तुत केले आहे. त्या शृंखलेचे हे चौथे पुष्प! - संपादक*

**नयनरम्य केनाई फयोर्ड्स**

सहलीच्या चौथ्या दिवशी आम्ही ‘केनाई फयोर्ड्स नॅशनल पार्क’ ला क्रूजने भेट देणार होतो. अतिशय संस्मरणीय असा हा अनुभव असणार हे ठाऊक असल्यामुळे त्यासाठी आम्ही सगळेजण अतिशय आतुर होतो.

भव्य सागरी किनारा लाभल्यामुळे अनेक क्रूज टूर्स अलास्का मध्ये उपलब्ध आहेत. इथले सृष्टी सौंदर्य जवळून पाहायचे असेल तर एक तरी क्रूज टूर करायलाच हवी. या टूर्स अलास्काचे एक वेगळेच रूप आपल्याला दाखवतात, आणि 'Alaska really begins where the roads end' जिथे रस्ता संपतो तेथे अलास्काचे दरवाजे खुले होतात- ही अलास्काची टॅगलाईन अक्षरशः सार्थ ठरवतात.

‘Where mountains, ice and ocean meet’ ‘जेथे पर्वत, हिम आणि समुद्राचे मिलन होते’ असे ज्या स्थळाचे वर्णन अलास्कन्स करतात ती जागा म्हणजे केनाइ द्वीपकल्प. या भागामध्ये सुमारे ५० टक्के पाणी बर्फाच्या स्वरूपात आहे. या प्रदेशातच Harding icefield या हिंममय प्रदेशाची उत्पत्ती झाली आहे; जेथे चाळीस हिमनद्या उगम पावतात. या नद्या पर्वतांवरून जेव्हा समुद्राकडे वाहतात तेव्हा त्यांच्या दाबामुळे द्विबाजूने पर्वत असलेल्या, सागरी पाण्याने भरलेल्या, ‘U’ आकाराच्या दऱ्या तयार होतात. त्यांना ‘फयोर्ड्स’ असे नाव आहे. साधारणतः ध्रुवीय प्रदेशात, जेथे हिंममय प्रदेश समुद्राच्या जवळ आहेत, तेथे हे भूभाग पाहायला मिळतात. आपल्याकडे हिमालय समुद्रापासून दूरवर असल्यामुळे हे आश्चर्य बघायला मिळत नाही. हे फयोर्ड्स जैवविविधतेचा खजिना मानले जातात. तसेच येथे दिसणाऱ्या अनुपम दृश्यांसाठी देखील ते सुप्रसिद्ध आहेत.

आम्ही दुपारी साडे-अकराची केनाई फयोर्ड्स नॅशनल पार्कची क्रूज टूर आरक्षित केली होती. सुमारे एक तास आधी हॉटेलच्या समोरच असलेल्या बंदरावर पोहोचलो. थोड्याच वेळात बोर्डिंग सुरू झाले. क्रूज मध्ये जाऊन बसलो. खालचा व वरचा अशी दुमजली क्रूज होती. आम्ही खालच्या मजल्यावर टेबलाभोवती आसनस्थ झालो. या बंद, उबदार, खोलीवजा केबिन बाहेर मोकळा डेक होता. भव्य खिडक्यांमुळे आत बसून, आणि जेव्हा वाटेल तेव्हा डेक वर जाऊन सृष्टी सौंदर्याचा मनमुराद आनंद घेता येत होता.




**आमची क्रूजशिप**

क्रूज सुरू झाल्यावर येथेही उद्घोषणेद्वारे सतत आजूबाजूची माहिती दिली जात होती. पहिला सुमारे

एक तास आम्ही बाहेर डेकवरच होतो. अत्यंत थंड बोचरा वारा असून देखील आमचा उत्साह ओसंडून वाहत होता.

आजूबाजूला भिंतींसारख्या हिमाच्छादित पर्वतरांगा व त्यामधून वेगाने जाणारी आमची क्रूज, सोबतीला निळंशार पाणी, निळे निरभ्र आकाश आणि बेधुंद करणारा वारा! सगळीकडे निळाई दाटलेली. इतके दिवस या सागराचे दूरवरून दर्शन होत होते. आज मात्र जवळून त्याचे खोडसाळ रूप अनुभवत होतो. मला कुसुमाग्रजांच्या कवितेतील ओळी आठवल्या.


'आवडतो मज अफाट सागर, अथांग पाणी निळे;
निळ्या जांभळ्या जळात केशर, सायंकाळी मिळे.
फेस फुलांचे सफेद शिंपीत वाटेवरती सडे;
हजार लाटा नाचत येती गात किनाऱ्याकडे.'

साधारण शंभर मैल अंतर पुढे आल्यावर विहंगम दृश्य दिसू लागले. येथे माशांचे खाद्य प्लॅन्कटॉन्स (planktons) जास्त प्रमाणात असल्यामुळे व्हेल मासे मोठ्या प्रमाणात असल्याची घोषणा झाली; आणि खरोखरच एक व्हेल मासा डुबकी मारतानाही दिसला.



**क्रूज मधून दिसणारे विहंगम दृश्य**

आणखी पुढे गेल्यावर 'अलास्का मेरिटाईम नॅशनल वाइल्डलाइफ रेफ्युज' हा अनेक बेटांचा बनलेला प्रदेश दिसू लागला. सागरी पक्षीदर्शनासाठी हा भाग प्रसिद्ध आहे असेही कळले. समोर अनेक पांढऱ्या रंगाचे पक्षी विहरत होते. 'tufted puffins' नावाचे पक्षी देखील दिसले. नारंगी रंगाची चोच असलेले हे पक्षी अतिशय रुबाबदार दिसत होते. याशिवाय सी लायन्स, सी ऑटर्स इत्यादी प्राणी देखील दृष्टीस पडले. क्रूज कॅप्टन विशिष्ट स्थळाजवळ अथवा प्राणी-पक्षी आढळले तर क्रूजचा वेग कमी करून आम्हाला निरीक्षणासाठी व छायाचित्रणासाठी पुरेसा वेळ देत होते.



**मुक्तपणे विहरणारा 'tufted puffin'**



**शांत पहुडलेले सी लायन्स**

अलास्का मधील वन्यजीवांचं मला नेहमीच कुतूहल वाटत आलेलं आहे. प्रत्येक प्राण्याचे एक जैविक घड्याळ असते. प्राणीपक्ष्यांचे जैविक घड्याळ सूर्योदय व सूर्यास्तावर अवलंबून असते. अलास्का मध्ये रात्री दहा-साडेदहापर्यंत, उजेड असेल तोवर पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू येई. मोठा दिवस अथवा मोठी रात्र यांना या जीवांची जैविक घड्याळे कशी

जुळवून घेत असतील? परमेश्वराची लीला अगाध आहे हेच खरे!

साधारण दीड तास प्रवास झाल्यावर आमची बोट पाण्यावर हिंदकळू लागली आणि आमच्या पैकी बऱ्याच जणांना डोकं भणभणणे, मळमळ असा 'sea sickness' चा त्रास सुरू झाला. मी त्यासाठी आधीच औषधे घेतली होती. तरीही थोडा त्रास झाला खरा. साधारण तासभर झोप काढली आणि त्रास थांबला. सुमारे तीन एक तास प्रवास झाल्यावर आम्हाला जेवण म्हणून अतिशय चविष्ट, गरमागरम व्हेज रॅप दिले गेले.

अलास्का मधील आणखी एक उल्लेखनीय बाब म्हणजे; रेल प्रवास असो वा क्रुज प्रवास, कर्मचारी वर्ग कायम हसतमुखाने आमचे स्वागत करत असे, स्वतःहून आमच्याशी बोलायला येत असे. आम्ही कुठून आलो आहोत? एवढ्या लांबून अलास्काला कसे आलो? इत्यादी बाबींवर संभाषण होई. काहींना भारताबद्दल कुतूहल होते. आपला देश बघायची उत्सुकता होती. त्यांच्या बोलण्यात आपुलकी जाणवे. आम्ही आत्तापर्यंत अलास्का मध्ये काय काय बघितले; अजून कोठे जायला हवे; याबद्दलही ते सांगत. बोट लागल्यावर देखील एक कर्मचारी आम्हाला काही औषध हवे आहे का; जरा वेळाने आम्हाला बरं वाटतंय का; म्हणून विचारपूस करायला आली. अशाप्रकारे स्थानिक अलास्कन्सशी संवाद साधताना अतिशय आनंद होत होता.

क्रुझने जाताना 'एक्झिट ग्लेशिअरचा शेवटचा थांबा होता. शुभ्र बर्फाची उभी उंच भिंत असावी तसे दृश्य दिसत होते. अन् आणखी एक निसर्गविशेष नजरेस पडला. तो म्हणजे 'glacier calving'. हिमरूपी भिंतीवरचे थोडे थोडे बर्फ तुकड्यांच्या रूपात खाली पडत होते. हे अद्भुत दृश्य नेहमी दिसतेच असे नाही. प्रवासिनीदेवीचे यासाठी पुन्हा आभार मानून पुढे निघालो. साधारण साडे-पाच, सहा तासांनी हा चित्तथरारक प्रवास संपला. परंतु त्याच्या रम्य आठवणी मनःपटलावर कायमच्या कोरल्या गेल्या आहेत.



**exit glacier**

सुवर्ड मधला आमचा आज शेवटचा दिवस होता... दुसऱ्या दिवशी सकाळी अँकरेजसाठी निघायचं होतं. सुवर्ड मनाला खूप भावलं ...हॉटेल मधून मनोहारी दृश्य तर दिसेच; पण कधीही बाहेर पडावं, समोरच्या रस्त्यावर फेरफटका मारावा, बंदरावरील बोटी पाहव्यात, आकर्षकरित्या वस्तू सजवलेल्या दुकानांमध्ये window shopping करावं, असे आमचे दोन दिवस कसे सरले ते समजलंच नाही. हिमाच्छादित पर्वतांची कायम सोबत असे. दरवेळी ते वेगळेच भासत. ते माझ्याशी बोलतायत् असं वाटे. शेवटच्या दिवशी तर 'Northern lights' दिसतील असं भाकीत होत. आम्ही रात्री बराच वेळ बाहेर पाहत होतो; पण हा मौसम नसल्यामुळे हे आश्चर्य अनुभवता आले नाही.

जादुई सृष्टीसौंदर्य, क्रूजसफर, Dog sledding सारखे उपक्रम - या जागेने आम्हाला भरभरून आनंद दिला. पुन्हा कधी इकडे येता येईल का या विचाराने मन भरून आले. पण अलास्कात पुन्हा भटकंती करण्यासाठी आपण नक्की परत येऊ असे मनाला सांगत आम्ही झोपी गेलो.

**- डॉ. जयश्री पवार**
सहाय्यक प्राध्यापिका
जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभाग
बा. ना. बांदोडकर महाविद्यालय, ठाणे

# परिसर वार्ता

**– संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**१५ फेब्रुवारी शनिवार संध्याकाळ<br>१६ फेब्रुवारी रविवार सकाळ } शाळेत मुक्काम**

सिनीयरच्या मुलांना या उपक्रमाची उत्सुकता लागलेली असते. १५ तारखेला शनिवारी संध्याकाळी ७ वाजता मुलं त्यांच्या बॅगा सांभाळत शाळेत आली. आपापल्या वर्गात बॅगा ठेवून गप्पांमध्ये रंगून गेली. सर्वांना एकत्रित करण्यात आले. मुलांनी नृत्य, गाणी असे सादरीकरण केले. मुलांचे काही खेळ घेण्यात आले.

नंतर हात स्वच्छ धुऊन सर्वजण जेवणासाठी तयार झाली. पुरी–भाजी व श्रीखंड अशा आवडत्या मेनूवर मुलांनी ताव मारला.

बेडेकर शाळेच्या प्रांगणात शेकोटीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुलांनी वेगवेगळी गाणी गायली. मग हातपाय धुऊन रात्रीचे कपडे घालून झोपायची तयारी, शिक्षकांच्या मदतीने अंथरूणे घालून आपल्या मित्र–मैत्रिणी समवेत झोपली. रविवारी सकाळी ७ वाजता बॅगा भरून ब्रश करून घरी जाण्यास तयार झाली.

**१९ फेब्रुवारी – शिवजयंती**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत राजा शिवछत्रपती यांची जयंती १९ फेब्रुवारीला साजरी करण्यात आली. शिवरायांचा जीवनपट, त्यांचे बालपण, स्वराज्य स्थापनेच्या गोष्टी यांच्याबद्दल मुलांना ए.व्ही. चा उपयोग करून देण्यात आला.

**२० फेब्रुवारी – पोळ्या लाटणे**

कणीक भिजवून कणकेचा मोठा गोळा तयार ठेवला. मुलांनी दोन्ही हातांनी छोटे गोळे केले. शिक्षकांचा सूचनांप्रमाणे पोळ्या करण्याचा आनंद मुलांनी घेतला.

नर्सरीच्या मुलांनी भिजवलेल्या कणकेच्या गोळ्यापासून साप, पानं, फुलं, लाडू असे विविध प्रकार केले.

**२५ फेब्रुवारी – महाशिवरात्र निमित्त फुलांची सजावट**

मुलांना फुलांबद्दल विविध माहिती देण्यात आली. या उपक्रमाअंतर्गत फुलांचे विविध उपयोग मुलांना शिकवण्यात येतात. शिवरात्र सणानिमित्त फुलांची सजावट घेण्यात आली. प्रत्येक मुलाने १/२ फुलं आणली होती. सर्व फुलं एकत्र करण्यात आली. शिक्षकांच्या मदतीने मुलांनी शंकराच्या पिंडीच्या आजूबाजूला सजावट केली.

**२७ फेब्रुवारी – मराठी भाषा दिवस**

महाराष्ट्राची राज्यभाषा, मराठी भाषेचा सन्मान म्हणून, तसेच कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस २७ फेब्रुवारी 'मराठी भाषा दिवस' म्हणून साजरा केला जातो. कुसुमाग्रजांचा फोटो मुलांना दाखवून त्यांची ओळख मुलांना करून देण्यात आली. मराठी अभिमान–गीत मुलांना ऐकवण्यात आले. मराठीतून गोष्ट आणि गाणी घेण्यात आली. मराठी भाषेतील काही लेखक, कवी यांची नावे मुलांना सांगण्यात आली.

**१ मार्च – पालक सभा**

२०२४–२५ या वर्षातील शेवटच्या पालक सभेचे आयोजन या दिवशी करण्यात आले होते. एप्रिल

महिन्यात घेतल्या जाणाऱ्या निरीक्षणाबद्दल पालकांना माहिती देण्यात आली.

**५ मार्च – सॅलेड बनवणे**

ज्युनियर के.जी.च्या मुलांबरोबर हा उपक्रम घेतला. काकडी, गाजर आणि टोमॅटो या भाज्या शिक्षकांनी आणल्या. सर्व भाज्या स्वच्छ धुतल्या. काकडी, टोमॅटो चिरून व गाजर किसून मुलांना चाट मसाला व मीठ घालून खायला दिल्या. कच्च्या भाज्या खाण्याचे महत्त्व मुलांना सांगितले. मुलांनी आवडीने सॅलेड खाल्ले.

**१३ मार्च – होळी**

मराठी महिन्यातील शेवटचा महिना फाल्गुन या महिन्यातील रंगांचा सण रंगपंचमी. १३ तारखेला मुलांनी साधे कपडे घातले होते. होळी, पाण्याचा अपव्यय टाळणे, नैसर्गिक रंगाची माहिती मुलांना दृक–श्राव्य माध्यमांचा उपयोग करून देण्यात आली. पर्यावरण शाळेने तयार केलेले नैसर्गिक रंग वापरून होळी साजरी केली गेली.

**२६ मार्च – बनी टमटोला एकत्रीकरण**

सिनीयर के.जी.च्या सर्व मुलांना वर्षाच्या अखेरीस बनी टमटोलाचा ३ वर्षांचा कालावधी पूर्ण केल्याबद्दल प्रशस्तीपत्रक देण्यात येते. शाळेचे शिक्षक व ठाणे जिल्हा स्काऊट गाईडचे प्रमुख श्री. केशव सर यांच्या हस्ते मुलांना ही प्रशस्तीपत्रके देण्यात आली. केशव सरांनी मुलांना २/३ वेगळ्या प्रकारच्या टाळ्या शिकवल्या व गाणेही शिकवले. सर्व विद्यार्थ्यांना प्रगती पुस्तकाबरोबर हे प्रशस्तीपत्रक दिले जाईल.

बनी टमटोला अंतर्गत मार्च महिन्यात पुढील उपक्रम घेतले गेले.

१) वर्ग, तसेच परिसर स्वच्छ करणे.

२) झाडांना पाणी घालणे.

**२८ मार्च – गुढीपाडवा**

हिंदू कालगणनेनुसार गुढीपाडवा हा नवीन वर्षाचा पहिला दिवस. या दिवसाचे महत्त्व, साजरा करण्याची पद्धत, शहरातील स्वागतयात्रा याबद्दल मुलांना माहिती दिली गेली.

**२७ मार्च – पपेट शो**

वर्षभर शिक्षक गाणी व गोष्टींच्या माध्यमातून मुलांच्या भाषा विकासावर भर देत असतात यात तोंडी गोष्ट सांगणे, पुस्तके, चित्रे यांच्या मदतीने गोष्टी सांगणे असे उपक्रम होतात. यातीलच अजून एक पद्धत म्हणजे पपेटस्‌चा वापर करून मुलांना गोष्ट सांगितली. मुलांना यात खूपच मज्जा आली.

**१ एप्रिल – १० एप्रिल – वार्षिक निरीक्षण**

या दरम्यान पूर्व प्राथमिक विभागाचे वार्षिक निरीक्षण घेतले गेले. काही संकल्पना तोंडी, काही प्रत्यक्ष कृतीतून तर काहींसाठी कार्यपत्रिकांचा वापर केला गेला.

**निकाल –** या निरीक्षणाचा निकाल २९ एप्रिल रोजी होणाऱ्या पालक सभेत पालकांना देण्यात आला.

**१४ एप्रिल ते १७ एप्रिल व २१/२२ एप्रिल – छंद वर्ग**

या दरम्यान ज्यूनियर के.जी. – ९.३० ते ११.००<br>
नर्सरी – १०.०० ते १२.००<br>
सिनियर – ११.३० ते १.००

या वेळेत छंद वर्ग घेण्यात आले. कागदी डीश, ग्लास, जुन्या सी.डी. यापासून विविध कलात्मक वस्तू बनवण्यास शिकवण्यात आल्या.

**वर्षभर घेण्यात येणारे उपक्रम –**

- आठवड्यातून एकदा - संगीत तासिका व वाचनालय तासिका घेण्यात येते.

- योगाची तासिका सिनीयर के.जी.च्या मुलांसाठी आठवड्यातून एकदा घेण्यात येते.
- विविध खेळ, टर्फ, बागेतील साहित्य (झोपाळा, घसरगुंडी) यासारख्या शारीरिक वाढीला पोषक उपक्रम घेतले जातात.
- महिन्यातील विशेष दिवस पौर्णिका, अमावस्या महिला दिन, बालदिन या विषयी वेळोवेळी माहिती दिली जाते.
- नवीन समाजमाध्यमांचा वापर करून (फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉटस्अप) शाळेतील विविध गोष्टींची माहिती पालकांना दिली जाते.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### १ एप्रिल २०२५ क्लायंट समुपदेशन / पक्षकार समुपदेशन स्पर्धा आयोजन :

दिनांक १ एप्रिल २०२५ रोजी येथे क्लायंट समुपदेशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धा ही विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि सहा. प्रा. विनोद वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले होती. सदर स्पर्धेसाठी एकूण तीन केसेसच्या तपशील देण्यात आला होता. सदर स्पर्धा वेगवेगळ्या तीन वर्गांमध्ये आयोजित केल्या होत्या. स्पर्धे मध्ये एकूण ३० विद्यार्थी सहभागी झाले होते. क्लायंट म्हणून सर्व प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला. सर्वोत्कृष्ट म्हूणन तीन क्रमांक काढण्यात आले. प्रथम क्रमांक उदय शिरसाळकर, दुसरा क्रमांक सचिन लवंगरे आणि तिसरा क्रमांक मुकेश थॉमर, आणि मिहीर यांना मिळाले. सदर स्पर्धेसाठी न्यायाधीश म्हणून डॉ. मिथुन बनसोडे आणि विद्या गायकवाड यांनी काम पाहिले. सदर स्पर्धेसाठी सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर वर्ग उपस्थित होता.



### डॉ. व्ही. एन. बेडेकर स्मृती व्याख्यान : मर्यादित दायित्व भागीदारी अधिनियम, २००८

दिनांक ४ एप्रिल २०२५ रोजी महाविद्यालयाच्या मूट कोर्ट सभागृहात प्रतिष्ठित डॉ. व्ही. एन. बेडेकर स्मृती व्याख्यानाचे आयोजन केले होते. हे स्मृती व्याख्यान विद्या प्रसारक मंडळाचे दूरदृष्टी संपन्न माजी अध्यक्ष डॉ. व्ही. एन. बेडेकर यांच्या सन्मानार्थ दरवर्षी आयोजित केले जाते, जे गुणवत्तापूर्ण शिक्षण व नैतिक नेतृत्वासाठी वाहून घेतलेले होते. हे व्याख्यानमालेचे उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थी कायदेतज्ज्ञांमध्ये शैक्षणिक उत्कृष्टता, व्यावसायिक नीतिमत्ता व व्यवहारज्ञान वाढवणे होय.या वर्षीच्या व्याख्यानाचा विषय होता – मर्यादित दायित्व भागीदारी अधिनियम, २००८, जो सध्याच्या कायदेशीर व व्यावसायिक संदर्भात अत्यंत महत्त्वाचा आहे, तसेच द्वितीय वर्ष एल.एल.बी. विद्यार्थ्यांच्या करार कायदा दोन या विषयांतील एक मुख्य भाग आहे. हे सत्र वर्गातील शिक्षणाला पूरक ठरावे व विद्यार्थ्यांना आधुनिक व्यवसाय व्यवस्थांमध्ये LLP चा व्यावहारिक उपयोग समजावा या हेतूने आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. यतीन पंडित यांच्या

भाषणाने झाली, ज्यात त्यांनी डॉ. बेडेकर यांच्या वारशाचा गौरव केला आणि अशा व्याख्यानांच्या माध्यमातून शैक्षणिक व व्यावहारिक अंतर कसे कमी करता येते यावर प्रकाश टाकला. त्यांनी उपस्थित मान्यवर, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे स्वागत केले. त्यानंतर प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी प्राचार्य भाषण दिले. त्यांनी स्मृती व्याख्यानाच्या परंपरेचे कौतुक करताना भारताच्या विकसित होत असलेल्या अर्थव्यवस्थेत कॉर्पोरेट कायद्यांचे, विशेषतः LLP च्या वाढत्या महत्त्वावर भर दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना सत्रामध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले आणि अशा तज्ज्ञांकडून प्रेरणा घेण्यास प्रोत्साहित केले. प्रा. शिवाजी बिबे यांनी कार्यक्रमाचे मुख्य वक्ते सी.एस. स्वाती निवाळकर यांचा परिचय करून दिला. त्या एक अनुभवी व ख्याती प्राप्त प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी असून, व्यावसायिक कायद्यांचे सुस्पष्ट विश्लेषण आणि अध्यापनाची आवड यासाठी ओळखल्या जातात. त्यांचे कंपनी कायदा, करार कायदा आणि व्यावसायिक अनुपालन यांवरील सखोल ज्ञान त्यांना या व्याख्यानासाठी अत्युत्तम निवड ठरवते. औपचारिक सत्कारानंतर सी.एस. स्वाती निवाळकर यांनी मर्यादित दायित्व भागीदारी अधिनियम, २००८ या विषयावर अत्यंत प्रभावी व सखोल व्याख्यान दिले. त्यांनी भारतातील LLP चा विकास, त्यांच्या संकरित स्वरूपाचे स्पष्टीकरण, अधिनियमातील महत्त्वाच्या तरतुदी आणि स्टार्टअप्स, MSMEs आणि व्यावसायिक सेवा क्षेत्रांतील LLP चा उपयोग प्रत्यक्ष उदाहरणांसह समजावून सांगितला. सत्र संवादात्मक होते आणि त्यांनी अनेक प्रकरणांवर आधारित चर्चा घेतली ज्यामुळे विषय अधिक सजीव वाटला. एल.एल.बी. च्या सर्व तीन वर्षांतील १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्वक सहभाग घेतला आणि संपूर्ण सत्रात उत्सुकतेने लक्ष दिले. प्रश्नोत्तर सत्रामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी आपले शंका विचारल्या आणि वक्त्यांनी त्या अत्यंत समर्पकतेने स्पष्ट केल्या. त्यामुळे चर्चेला अधिक उभारी मिळाली आणि विषयाची समज वाढली. कार्यक्रमाचा समारोप प्रा. मनोज नाईक यांनी दिलेल्या कृतज्ञता प्रस्तावाने झाला. त्यांनी कॉलेजच्यावतीने सी. एस. स्वाती निवाळकर यांचे अमूल्य वेळ आणि माहितीपूर्ण सत्रासाठी आभार मानले. तसेच प्राचार्य, प्राध्यापक संयोजक, तांत्रिक विभाग आणि विद्यार्थी स्वयंसेवकांचे व्याख्यान यशस्वीपणे पार पाडण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल मनःपूर्वक आभार मानले.




**वार्षिक पारितोषिक वितरण आणि निरोप समारंभ शैक्षणिक वर्ष २०२३–२०२४**

वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ दिनांक ५ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ४:०० वाजता मूट कोर्ट हॉलमध्ये पार पडला. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ श्री. सुरेश पायकर उपस्थित होते. इतर मान्यवर अतिथींमध्ये ॲड. अनंत गदारे आणि विधिबंध माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सुनील परांजपे यांचा समावेश होता. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन या शुभ कार्याने झाली. त्यानंतर

प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी स्वागतपर भाषण केले. प्राचार्यांनी सर्व अतिथींचे सत्कार केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक कृष्णा कामत यांनी केले. सहाय्यक प्राध्यापक विनोद वाघ, मेहशेरी हेतल आणि डॉ. रुपाली जमोदे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली आणि आभार प्रदर्शन केले. या वेळी शैक्षणिक गुणवत्ता क्रमवारीत अग्रस्थान मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना, महाविद्यालयांतर्गत आणि आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांचे विजेते, पुस्तक परीक्षण स्पर्धा, फ्रेशर्स डिबेट, वक्तृत्व, मूट कोर्ट, विधी साहाय्य स्वयंसेवक, तसेच RERA आणि निवडणूक कायदे यांसारख्या ॲड-ऑन सर्टिफिकेट कोर्समध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचाही सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा व यशाचा गौरव करणारा ठरला आणि आनंददायी, तसेच प्रेरणादायी वातावरणात समाप्त झाला.



तृतीय वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक ८,९,१० एप्रिल रोजी रात्री ८.३० ते ९.३० या वेळेत विद्यार्थ्यांचे फॉरेन्सिक पुराव्यांवर ऑनलाइन व्याख्याने घेण्यात आले. सदर व्याख्यान मालेस फोरेन्सिक सायन्स तज्ज्ञ श्री गोपीचंद खाडे व्याखाते म्हणून लाभले

**आपत्ती व्यवस्थापन व्यावहारिक प्रशिक्षण :**

आपत्ती कमी करणे... धोक्यात असलेल्या लोकांचे स्वावलंबन वाढवते - दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, ते सक्षमीकरण करते.

९ एप्रिल २०२५ रोजी त्याच भावनेने, आपत्ती व्यवस्थापन कायद्यातील अतिरिक्त प्रमाणपत्र कार्यक्रमाचा भाग म्हणून महाविद्यालयामध्ये आपत्ती व्यवस्थापनावरील एक विशेष व्यावहारिक प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. त्यासाठी यशवंतराव चव्हाण अकादमी ऑफ डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशन (यशदा) पुणे येथील दोन अपवादात्मक मास्टर ट्रेनस, श्री विवेक नायडू आणि श्री लखन गायकवाड हे आमच्यासोबत होते हे आमचे भाग्य आहे. महाविद्यालयाच्या मनु सभागृहात (मूट कोर्ट हॉल) दुपारी ३.०० वाजता सत्र सुरू झाले. सहाय्यक प्राध्यापक श्रीमती कृष्णा कामथ केसकर यांनी सर्वांचे स्वागत करून आणि मास्टर ट्रेनर्सची ओळख करून देऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. श्री विवेक नायडू यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षणात पूर्ण एकाग्रता मिळवण्यासाठी ब्रेन टीझर क्रियाकलापांमध्ये सहभागी करून कार्यक्रमाची सुरुवात केली. श्री. नायडू यांनी विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण किती महत्त्वाचे आहे हे समजावून सांगितले. कारण नैसर्गिक असो वा मानवनिर्मित, आपत्ती कधीही आणि कुठेही येऊ शकते आणि मर्यादित उपलब्ध संसाधनांच्या मदतीने स्वतःला आणि इतरांना वाचवण्यासाठी आपण सर्व मूलभूत प्रशिक्षणांनी सुसज्ज असले पाहिजे. प्रशिक्षण जसजसे पुढे जात गेले तसतसे प्रशिक्षणात विविध प्रकारचे जीवनरक्षक गाठी शिकणे, मूलभूत प्रथमोपचार, मूलभूत जीवन आधार (सीपीआर), अग्निशमन चालणे,

अग्निशामक उपाय इत्यादी अधिकाधिक मनोरंजक घटक समाविष्ट केले गेले. दोन्ही मास्टर ट्रेनर्सनी साप चावणे, कुत्रा चावणे, मधमाशीचा हल्ला इत्यादी परिस्थितीत जीवनरक्षक तंत्रे देखील सामायिक केली. वास्तविक जीवनातील आपत्तीजनक घटनांचा वापर करून झोपण्यापूर्वी गॅस रेग्युलेटर बंद करण्याची आवश्यकता देखील अधोरेखित करण्यात आली. प्रशिक्षणाच्या शेवटी, आमच्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या बास्केटबॉल कोर्टवर नेण्यात आले, जिथे त्यांना अग्निशामक यंत्र उघडण्याचे आणि अत्यंत सावधगिरीने आणि सुरक्षिततेने आग विझवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. कारण असे वारंवार दिसून येते की, आमच्या परिसरात फायटर फायटिंग एक्सटिंग्विशर्स उपलब्ध असूनही, ते कसे उघडायचे आणि त्यांचा प्रभावीपणे वापर कसा करायचा हे विद्यार्थ्यांना क्वचितच माहीत आहे. सहभागी झालेले सर्व विद्यार्थी खूप उत्साहित होते आणि त्यांनी सर्व प्रशिक्षण उपक्रमांमध्ये उत्साहाने भाग घेतला. कार्यक्रमाचा शेवट आमच्या एलएलबीच्या पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्याच्या सिद्धार्थ शुक्लाच्या अतिथी प्राध्यापकांचे अपवादात्मक प्रशिक्षण दिल्याबद्दल आभार मानून झाला.



**११ एप्रिल, २०२५ रोजी महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांची जयंती संयुक्तरीत्या साजरी :**

विद्या प्रसारक मंडळाचे टी. एम.सी. विधी महाविद्यालय आणि सहा. आयुक्त, समाज कल्याण विभाग, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने समता पर्व अभियानांतर्गत आयोजित महात्मा जोतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त दिनांक ११ एप्रिल, २०२५ रोजी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विविध पैलू' या विषयावर माजी जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. संजय भाटे व महात्मा फुले आणि सामाजिक परिवर्तन या विषयावर प्रा. विनोद एच वाघ यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. तसेच प्रा. मनोज नाईक व प्रा. प्रेरणा वसावे यांनी डॉ. आंबेडरांचे शैक्षणिक विचार यावर आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रभारी प्राचार्या डॉ श्रीविद्या जयकुमार यांच्या हस्ते झाले. यावेळी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. परीक्षक म्हणून प्रा. हेतल मिशेली व डॉ. रुपाली जामोदे यांनी काम बघितले. प्रा. यतीन पंडित यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी बोलतांना श्री. भाटे यांनी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक नात्याची चर्चा केली. छत्रपती शिवाजी महाराज ते डॉ. आंबेडकर असा प्रवास त्यांनी मांडला. विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांचा आदर्श घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्रा. विनोद एच वाघ यांनी महात्मा फुले यांच्या व्यावसायिक कार्यावर भर दिला. महात्मा फुलेंच्या स्त्री शिक्षणापलीकडे असलेल्या इतर कार्याची माहिती असणे ही आवश्यक असल्याचे सांगितले. महात्मा फुलेंची कंपनी, पुणे कमर्शियल एन्ड कॉन्ट्रॅक्टींग कंपनी ने मुंबई व पुण्यामधील अनेक ऐतिहासिक इमारती बांधल्याचे दाखले देण्यात आले.



## डॉ. वा. ना. बेडेकर यांचा एकविसावा स्मृतीदिन :

सोमवार, दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी ठाण्याच्या या शिक्षण – महर्षी कै. डॉ. वासुदेव नारायण बेडेकर यांच्या एकविसाव्या स्मृतीदिनानिमित्त विद्या प्रसारक मंडळातर्फे संस्थेच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहामध्ये माजी भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी व चाणक्य मंडळ परिवार चे संस्थापक व संचालक श्री. अविनाश धर्माधिकारी (भा.प्र.से.) यांचे, 'बदलता काळ आणि युवक' या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान पार पडले. पुस्तकी ज्ञानाबरोबरच कौशल्य आधारित शिक्षणाचे महत्त्व त्यांनी विषद केले. शिक्षण हे केवळ नोकरीसाठी मर्यादित न ठेवता व्यक्तिमत्त्व विकासासाठी असावे. फक्त डॉक्टर वा इंजिनीयर होणे म्हणजे यश नाही. लेखक, कलाकार, क्रीडापटू, शिक्षक, संशोधक, प्रशासन इ. क्षेत्रातही युवकांनी प्रगतीच्या संधी साधाव्यात. सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर वर्ग उपस्थित होता.






## ॲडव्होकेट अनंत गद्रे यांचे बँकिंग विषयावर टी. एम. सी. विधी महाविद्यालयात व्याख्यान

ॲडव्होकेट अनंत गद्रे यांचे दिनांक २०, २१ मार्च आणि २ एप्रिल २०२५ रोजी 'बँकिंग' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. सदर व्याख्यान हे ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आले. व्याख्यान सुरू होण्यापूर्वी विधी महाविदयालच्या प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी प्रस्तावना केली. भारतामधील केंद्रीय बँकेच्या धोरणाचा साचा/रचना, भारतीय रिझ्रर्व्ह बँक अधिनियम १९३४ खाली विहित केलेल्या तिच्या उद्दिष्टांभोवतीच तयार करण्यात आला आहे, म्हणजे 'बँक नोटांचे वितरण नियंत्रित करणे व भारतात नाणेविषयक स्थैर्य ठेवण्यासाठी राखीव निधी ठेवणे, आणि हे उद्दिष्ट देशाची आधुनिक अशी चलन विषयक व कर्ज प्रणालीचा साचा, देशाच्या हितासाठी कार्यरत करणे, आणि विकासाचे उद्दिष्ट लक्षात ठेवणे, किंमती स्थिर ठेवणे हे प्राथमिक उद्दिष्ट असलेल्या, वाढती गुंतागुंत असलेल्या अर्थव्यवस्थेचे आव्हान स्वीकारण्यासाठी एक आधुनिक असा नाणेविषयक धोरण साचा कार्यान्वित करण्याचे काम केंद्रीय बँकच्या माध्यमातून केले जाते. सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल सेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट्स ॲक्ट' अर्थात सरफेसी आणि कर्ज वसुली न्यायाधिकरण (डीआरटी) व माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० द्वारे या कायद्यात आणखी सुधारणा करण्यात आल्या आहेत ज्याने बँकर्स बुक्सचा अर्थ आणि व्याप्ती

वाढवून संगणक दस्तऐवज, फाइल्स आणि बाह्य स्टोरेज समाविष्ट केले आहे. आता बँकिंगशी संबंधित कोणताही पुरावा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात सादर करता येतो. सदर व्याख्यानात सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर वर्ग उपस्थित होता.

**मुंबई विद्यापीठ परीक्षा : सत्र ६**

| **तारीख** | **विषय** | **वेळ** |
|---|---|---|
| १६ एप्रिल २०२५ | कर आकारणी कायदा | १०.३० ते १२.३० |
| १९ एप्रिल २०२५ | भारतीय साक्ष्य अधिनियम, | १०.३० ते १२.३० |
| २२ एप्रिल २०२५ | कायद्यांचा संघर्ष | १०.३० ते १२.३० |
| २४ एप्रिल २०२५ | औषधशास्त्राचा कायदा | १०.३० ते १२.३० |
| २८ एप्रिल २०२५ | विमा कायदा | १०.३० ते १२.३० |
| ३० एप्रिल २०२५ | बौद्धिक संपदा कायदा | १०.३० ते १२.३० |
| २ मे २०२५ | बँकिंग कायदा | १०.३० ते १२.३० |
| ५ मे २०२५ | महिला आणि बाल कायदा | १०.३० ते १२.३० |

**वि.प्र.मं चे विधी महाविद्यालयात नवीन रुजू झालेल्या ६ प्राध्यापकांचे मंजुरी प्रक्रिया प्रलंबित आहे**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ठाणे, यांच्या वतीने दि. २३ एप्रिल २०२५ रोजी 'मध्यस्थी नियमन' या विषयावर एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये वि प्र मं चे विधी महाविद्यालयाचे १० विद्यार्थांनी सहभाग घेतला. या कार्यशाळेमध्ये मध्यस्थीच्या माध्यमातून कशाप्रकारे विवादाचे निराकर्ण केले जाऊ शकते याचे प्रशिक्षण देण्यात आले.

**२४ एप्रिल रोजी विद्यापीठात अनफेअर मिन्स समितीची बैठक घेण्यात आली.**

**दिनांक २६ एप्रिल, २०२५ नौपाडा पोलीस ठाणे, ठाणे येथे शैक्षणिक भेट**

शनिवार, दिनांक २६ एप्रिल २०२६ रोजी एल.एल.बी. प्रथम व द्वितीय वर्षाच्या सुमारे ५० विद्यार्थ्यांनी नौपाडा पोलिस ठाणे, येथे शैक्षणिक भेट दिली. या भेटीचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना पोलिस ठाण्याचे कार्य व पोलिस प्रशासन याविषयी प्रत्यक्ष माहिती व अनुभव मिळवून देणे हे होते. भेटीची सुरुवात सकाळी ११:०० वाजता झाली व ती दुपारी १२:३० वाजेपर्यंत चालली. या कालावधीत विद्यार्थ्यांना पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधण्याची व प्रत्यक्ष कार्यपद्धती समजून घेण्याची संधी मिळाली. पुढील पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. ए.पी.आय. श्री दिनकर प्रकाश, ए.पी.आय. श्री दत्तात्रय यादव, पी. एस आय श्री सोन्ने आणि पो.हे. श्री प्रभाकर दुधाळे. या अधिकाऱ्यांनी पोलिस ठाण्याचे कार्य, तक्रार नोंदणीची प्रक्रिया, तपास कार्यपद्धती, कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी आणि समाजाभिमुख पोलिस कार्य अशा विविध विषयांवर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी या सत्रातून कायदाशास्त्राच्या व्यवहारातील पैलू अधिक चांगल्या प्रकारे समजून घेतले. ही शैक्षणिक भेट प्रा. चंदनी व्ही. घोगरे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडली. त्यांच्यासोबत प्रा. मनोजकुमार नाईक आणि श्री शुभम पवार हे महाविद्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. या भेटीतून विद्यार्थ्यांना न्यायप्रणाली व तिच्या अंमलबजावणीसंबंधी प्रत्यक्ष अनुभव मिळाला असून, त्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या दृष्टिकोनातून ही भेट अत्यंत उपयुक्त ठरली.






जानेवारी २०२५ मध्ये अंजुमन इस्लाम जंजीरा डिग्री कॉलेज, मुरूड यांच्या वतीने आयोजित रोड सेफ्टी अवेअरनेस या विषयावरील ऑनलाईन पथनाट्य स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला आहे. अर्चना भोळे (प्रथम वर्ष विधी), अनिकेत जाधव (प्रथम वर्ष विधी), दिशा खन्ना (प्रथम वर्ष विधी), प्रतिक्षा लिकर (प्रथम वर्ष विधी), ईश्वरसिंह चौहान (प्रथम वर्ष विधी), संतोष मोरे (प्रथम वर्ष विधी), सिद्धार्थ शुक्ला (प्रथम वर्ष विधी), राहुल वेश्विकार (द्वितीय वर्ष विधी), वेंकटेश अय्यर (द्वितीय वर्ष विधी). स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन :










२६ एप्रिल २०२५, रोजी ठाणे येथील जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन पार पडले. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांच्या हस्ते या नवीन इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी वि.प्र.मं चे विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार उपस्थित होत्या.







**४ मे रोजी होणाऱ्या राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा (NEET) च्या परीक्षेसाठी वि प्र मं चे विधी महाविद्यालय केंद्र आहे.**

**दिनांक २८/०४/२०२५ रोजी टाटा सामाजिक विज्ञान संस्था व भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद आयोजित एक दिवसीय कार्यशाळा – कॅम्पसमधील मानसिक आरोग्य**

सकाळी ९.०० ते सायं. ५.०० या वेळेत कार्यशाळेत प्रा. हेतल मिशरी आणि प्रा. रुपाली जमोदे यांनी सहभाग घेतला. या सत्रात मनाला प्रशिक्षण देणे व मानसिक आरोग्याच्या अडचणींनी ग्रस्त विद्यार्थ्यांची ओळख पटवणे यावर मार्गदर्शन करण्यात आले. हे सत्र अत्यंत माहितीपूर्ण होते.




**एलएल.एम. पुनरावलोकन आणि पूर्वतयारी परीक्षा ३० एप्रिल ते १० मे २०२५ घेण्यात येईल.**

**१७ एप्रिल – आपल्या मूळ संविधानातील चित्रे आणि त्यांचे महत्त्व या विषयावर डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांचे विशेष अतिथी व्याख्यान :**

प्रथम व द्वितीय वर्ष विधी विद्यार्थ्यांसाठी सौविधानिक कायदा ह्या विशेष व्याख्यान दिनाक १७ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानास माजी भारतीय प्रशासकीय अधिकारी चाणक्य मंडळ परिवाराचे संस्थापक श्री प्रशांत धर्माधिकारी प्रमुख वक्ते म्हणून लाभले होते ह्या व्याख्यानाचा विषय आपल्या मूळ संविधानातील चित्रे आणि त्यांचे महत्त्व असा होता सदर व्याख्यानास महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी ह्यांचा उत्तम सहभाग नोंदवला.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

२ एप्रिल २०२५: मुंबई विद्यापीठाच्या एमएमएस कोर्सच्या तिसऱ्या आणि चौथ्या सत्राच्या अभ्यासक्रमाच्या सुधारणेसाठी झालेल्या अभ्यास मंडळ सदस्यांच्या बैठकीला डॉ. नीतिन जोशी उपस्थित होते.

५ एप्रिल २०२५ : मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने क्लारा कॉलेजने आयोजित केलेल्या 'शाश्वत विकासात कृत्रिम बुद्धिमत्तेची भूमिका' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. मयुरा पाटील यांनी शोधनिबंध सादर केला.


CHILDREN WELFARE CENTRE
Clara's College of Commerce
Yari Road, Versova, Andheri (W), Mumbai - 400061
Affiliated to University of Mumbai and NAAC Re-Accredited

CERTIFICATE OF PARTICIPATION & PAPER PRESENTATION

THIS IS TO CERTIFY THAT

Mr. /Ms. /Mrs. /Dr. DR. MAYURA SUMIT PATIL

of DR. VN BEDEKAR INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES, THANE

has PARTICIPATED & PRESENTED RESEARCH PAPER titled

ARTIFICIAL INTELLIGENCE AND MACHINE LEARNING IMPLEMENTATION IN APPLICATION OF BHARTIYA MANAGEMENT THEORY AND STYLES

at One Day International Multi-Disciplinary Conference on " ROLE OF ARTIFICIAL INTELLIGENCE IN SUSTAINABLE DEVELOPMENT " organized in collaboration with University of Mumbai on Saturday, 05th April, 2025

Dr. Babita Kanojia
Convener

Dr. Madhukar Gitte
Principal

जेव्हा सगळंच संपून गेलंय असं आपल्याला वाटतं; तीच खरी वेळ असते नवीन काहीतरी सुरू करण्याची!

५ एप्रिल २०२५ : डॉ. कांचन अक्षय आणि डॉ. श्रीपाद बापट यांनी एमएमएस विद्यार्थ्यांसाठी ‘प्रभावी आंतर-वैयक्तिक कौशल्ये’ या विषयावर मूल्यवर्धित अभ्यासक्रम सुरू केला आणि २० विद्यार्थ्यांसाठी ३० तासांचे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले.



६ एप्रिल २०२५ : डॉ. मयुरा पाटील यांनी एनपीटीईएलचा ‘अॅडव्हान्स स्ट्रॅटेजिक एचआरएम’ हा पाठ्यक्रम ८४% गुणांसह यशस्वीरीत्या पूर्ण केला.


Elite
NPTEL ONLINE CERTIFICATION
This certificate is awarded to
MAYURA SUMIT PATIL
for successfully completing the course
Advances in Strategic Human Resource Management (HRM)
with a consolidated score of 84 %
Jan-Feb 2025
(4 week course)
Indian Institute of Technology Bombay
swayam

१२ एप्रिल २०२५ : सहाय्यक प्राध्यापक प्रथमेश उ तावडे यांनी ‘उद्योजक, कॉर्पोरेट/ उद्योग संस्था आणि व्यावसायिकांसाठी एआयची मूलभूत तत्त्वे’ या विषयावर २ दिवसांची कार्यशाळा पूर्ण केली.


Indian Institute of Technology Bombay
Educational Outreach
certifies that
Prathmesh Umesh Tawade
has participated in the course
Fundamentals of AI for Entrepreneurs, Corporates and Professionals
during April 12-13, 2025

१९ एप्रिल २०२५ : एमएमएस २०२४-२६ तुकडीच्या पहिल्या वर्षाची विद्यार्थिनी श्रीषा श्रीनिवास सतार्ले हिने इंडोनेशियातील देनपसार बाली येथे बाली अँड इंडिया फ्रेंडशिप असोसिएशन (बीआयएफए) द्वारे आयोजित आंतरराष्ट्रीय भारतीय रामायण बाली नृत्य नाट्य सांस्कृतिक कार्यक्रमात कलाविष्कार सादर केला.


VIBHAV INTERNATIONAL CULTURAL, EDUCATIONAL AND SOCIAL FOURUM, INDIA
SHREE MUDRA KALNIKETAN, INDIA
CROSSWAYS INTERNATIONAL, INDIA
BALI AND INDIAN FRIENDSHIP ASSOCIATION, BALI, INDONESIA
KIP TOURS AND TRANS, BALI, DMC, BALI, INDONESIA
Certificate
THIS IS TO CERTIFY THAT
Shreesha Satarle
HAS PARTICIPATED IN THE INTERNATIONAL INDIAN RAMAYAN BALI DANCE DRAMA CULTURAL PROGRAM
SATURDAY 19 APRIL 2025

२२ एप्रिल २०२५ : ब्रीम्सच्या सीएसआर समितीने २२ एप्रिल २०२५ रोजी ‘जागतिक वसुंधरा दिन’ साजरा केला व या निमित्ताने ‘आपली शक्ती - आपला ग्रह’ या विषय सूत्रावर एक सत्र आयोजित करण्यात आले.




३० एप्रिल २०२५ : डॉ. कांचन यांचा ‘कुटुंब व्यवसायासाठी उत्तराधिकार नियोजन’ या विषयावरील एक शोधनिबंध ‘इंटरनॅशनल जर्नल ऑफ मार्केटिंग अँड सोशल सायन्स’ या एबीडीसी अनुक्रमित नियतकालिकामध्ये प्रकाशित झाला.

•••

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❇ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❇ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❇ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| **सभागृहाचे नाव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❇ संपर्क ❇**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.